P CRA

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन-कृषि विभाग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. - ०२२-२२१६३३५१ई-मेल - mahapocra@gmail.com

जा.क्र. नादेकृसंप्र-०२१९/कृषिविद्या/शे.शा./प्र.क्र.२६/ /२०२० ३३० दिनांक: ४/५/२०२०

प्रति,

प्रकल्प संचालक (आत्मा)
(प्रकल्पातील सर्व जिल्हे)

विषय: हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा मार्गदर्शक सूचना सन २०२०-२१

उपरोक्त विषयास अनुसरून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत सन २०२०-२१ मध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा हा घटक राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना सहपत्रीत करण्यात येत आहेत. सदर सूचनांनुसारप्रकल्पांतर्गत सर्व गावांमध्ये शेतीशाळांची अंमलबजावणी करण्यात यावी. शेतीशाळांच्या अंमलबजावणीमुळे प्रकल्प गावांमध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा व्यापक अवलंब होणे अपेक्षित आहे. तरी याबाबत प्रकल्पाचे सनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणेच्या आहावालाम्धील निरीक्षणे आणि सूचना विचारात घेण्यात याव्यात. तसेच प्रक्षेत्र भेटींमधून शेतकऱ्यांचे अभिप्राय घेण्यात यावेत आणि शेतीशाळांची गुणवत्ता वाढवून त्यायोगे अधिकाधिक शेतकऱ्यांनी उपयुक्त तंत्रज्ञानाचा अवलंब करावा याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

सन २०२०-२१ मधीलशेतीशाळा नियोजन व अंमलबजावणी साठी नियमित तसेच मानधन तत्वावरील अधिकारी व कर्मचारी यांची तात्काळ बैठक/ कार्यशाळा घ्यावी तसेच प्रशिक्षक चमूची निवड प्रक्रिया दि. १५/०५/२०२० पर्यंत पूर्ण करण्यात यावी. प्रशिक्षण/ कार्यशाळा/ बैठका घेण्यासाठी जिल्हानिहाय लागू असलेल्या कोविड-१९ विषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

सोबत: वरीलप्रमाणे

(विकास चंद्र रस्तोगी)
प्रकल्प संचालक

प्रत माहितीस्तव,
१. सचिव(कृषि), मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त(कृषि), आयुक्तालय, पुणे
३. विभागीय कृषि सह संचालक

प्रत पुढील कार्यवाहीस्तव,
१. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (प्रकल्पातीलसर्व)
२. उपविभागीयकृषीअधिकारी (प्रकल्पातील सर्व)

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा मार्गदर्शक सूचना २०२०-२१

प्रकल्पाचा उद्देश सफल करण्यासाठी निवडलेल्या गावातील अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये हवामान अनुकूल कृषि तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे प्रसार करण्यासाठी "शेतीशाळा" ही कृषि विस्तार पद्धती अवलंबण्यात येणार आहे. जागतिक बँकेमार्फत प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी १४ निर्देशांक निश्चित केले असून त्यापैकी खालील निर्देशांकांचे मूल्य **शेतीशाळाया** बाबीच्या फलनिष्पत्तीवर सरळपणे अवलंबून आहे.

(१)हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब,

(२) पिकांच्या उत्पादकतेमधील स्थैर्य,

(३) वार्षिक उत्पन्नाचे तौलनिक प्रमाण

(४) खारपाण जमिनीच्या आरोग्यामध्ये सुधारणा आणि

(५) हवामान अनुकूल वाणांचा वापर

याशिवाय इतर निर्देशांकाच्या साध्यासाठीदेखील शेतीशाळेमध्ये सहभागी शेतकऱ्यांच्या शेतीपद्धतीमध्ये होणारे बदल उपयुक्त ठरणार आहेत.

शेतीशाळा: संकल्पना , व्याप्ती आणि कार्यपद्धती

शेतीशाळा म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्याच शेतात पिकांचा आणि शेतीपद्धतीचा अभ्यास करण्यास शिकविणे. प्रस्तुत प्रकल्पांतर्गत शेतीमध्ये हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या व भविष्यात उद्भवणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्यावरील उपाय स्थानिक पातळीवरच शोधण्याचा प्रयत्न करणे, सदर उपायांचा अवलंब करण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य शेतकऱ्यांना प्रदान करणे, आणि हवामान अनुकूल तंत्रज्ञान समजावून घेऊन त्यांचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांच्या क्षमतेमध्ये वृद्धी करणे या उद्देशाने शेतीशाळांचे आयोजन करावयाचे आहे. प्रयोगशील शेतकरी (Host Farmer) व प्रक्षेत्र, शेतकऱ्यांचा गट (Guest Farmers), प्रशिक्षक (Facilitator), तंत्रज्ञान/अभ्यासक्रम (Curriculum), प्रशिक्षण व्यवस्था, अत्यावश्यक निविष्ठा (Critical Inputs), प्रशिक्षण साहित्य आणि हे शेतीशाळेचे प्रमुख घटक आहेत.

शेतीशाळा या घटकाची जबाबदारी प्रकल्प संचालक,आत्मा यांचेवर राहील. सदर घटकासाठी जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक,आत्मा हे नियंत्रक व समन्वयक म्हणून काम पाहतील. उपप्रकल्प संचालक (आत्मा) हे शेतीशाळा घटकाचे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. शेतीशाळेतील तांत्रिक बाबींची प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि प्रकल्प गावामध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करण्यासाठी शेतीशाळा प्रशिक्षकाची (Facilitator) व्यवस्था करण्यात येत आहे आणि शेतीशाळा प्रशिक्षकांचे कामाचे प्रभावी सनियंत्रण व त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने शेतीशाळा समन्वयक (FFS Coordinator) यांच्या सेवा घेण्यात याव्यात. जिल्ह्यातील प्रकल्प गावांसाठी प्रशिक्षकांची निवड करणे आणि त्यांना शेतीशाळा कार्यपद्धतीबाबत सखोल प्रशिक्षण देणे या प्रमुख जबाबदाऱ्या प्रकल्प संचालक (आत्मा) यांच्या राहतील.जिल्ह्यातीलउपविभागनिहाय आवश्यक शेतीशाळा प्रशिक्षकांची निवड आणि प्रशिक्षणासाठी प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी कृषि विज्ञान केंद्रांच्या सहाय्याने आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे समन्वयाने कार्यवाही करावी. तसेच शेतीशाळा समन्वयक म्हणून काम करण्यास तयार असणऱ्या तज्ञांचे नामनिर्देशन करण्याची आणि त्यांच्या कामाचा समन्वय ठेवण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक (आत्मा) यांची राहील.

प्रकल्प क्षेत्रामधील १५ जिल्ह्यांमध्ये पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या गावांतील प्रमुख पिकांमध्ये आणि कृषिपद्धती मध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी खरीप २०१८पासून प्रत्येक प्रकल्प गावामध्ये शेतीशाळा आयोजित करण्यात येत आहेत. **सदर गावांमध्ये सन २०१८-१९ मध्ये निवडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर सन २०२०-२१ मध्ये तिसऱ्या वर्षाकरिता शेतीशाळा आयोजित करावयाच्या आहेत. सन २०१९-२० मध्ये निवडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर सन २०२०-२१ मध्ये दुसऱ्या वर्षाकरिता शेतीशाळा आयोजित करावयाच्या आहेत. सन २०२०-२१ मध्ये प्रकल्पाच्या तिसऱ्याटप्प्यातील निवडलेल्या गावांमध्ये प्रथम वर्षीच्या शेतीशाळा आयोजित करावयाच्या आहेत. पहिल्या टप्प्यातील निवडलेल्या गावामध्ये सन २०२०-२१ मध्ये शेतीशाळा घ्यावयाचे हे अंतिम वर्ष असल्यामुळे मागील हंगामातील पिकनिहाय फायदेशीर ठरलेल्या तंत्रज्ञानाचासंपूर्ण गावामध्ये अवलंब होईल याबद्दल खात्री करण्यात यावी. सदर गावामध्ये प्रकल्पाच्या**

उर्वरित कालावधीमध्ये शेतीशाळाच्या माध्यमातून अवलंबण्यात आलेले फायदेशीर तंत्रज्ञान शेतकऱ्याने व्यापक प्रमाणामध्ये स्वीकारणे अभिप्रेत आहे. याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी यांनी जाणीव पूर्वक प्रयत्न करावेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी शेतीशाळांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ठोस आराखडा तयार करावा. **शेती शाळांच्या यशश्चितेबाबत शेतीशाळा प्रशिक्षक, समूह सहाय्यक आणि कृषी सहाय्यक यांचे अंमलबजावणीबाबतचे तसेच शेतीशाळा समन्वयकांचे सनियंत्रणाबाबतचे उत्तरदायित्व निश्चित करावे.**

१. शेतीशाळांची संख्या, वर्ग संख्या आणि विषय

१.१. प्रत्येक प्रकल्प गावामध्ये शेतीशाळा आयोजित करण्यात याव्यात.

१.२. जी गावे बेचिराख/ उजाड असून जेथील शेतकऱ्यांचे वास्तव्य इतरत्र आहे त्या गावांमध्ये तसेच ज्या गावांमध्ये इतर काही कारणास्तव (नगरपालिकेमध्ये वर्ग, बुडीत क्षेत्र इ.) प्रकल्पातील घटक राबविण्यात येणार नाहीत तेथे शेतीशाळा आयोजित करू नये .

१.३. या कार्यालयास प्राप्त माहितीनुसार उजाड व बेचिराख गावे वगळूनखरीप व रबी २०२०मध्ये आयोजित करावयाच्याजिल्हानिहाय/उपविभागनिहाय शेतीशाळांचे नियोजन (लक्ष्यांक) आणि त्यासाठी आवश्यक शेतीशाळा प्रशिक्षकांची (फॅसिलिटेटर) संख्या सोबत दिलेल्याप्रपत्रानुसार राहील.

१.४. जी गावे शेतीशाळा आयोजित करण्यासाठी निश्चित करण्यात आलेली आहेत त्यापैकी प्रत्येक गावामध्ये खरीप हंगामात प्रमुख पिकांच्या/ पिक पद्धतीच्या २ आणि रबी हंगामात प्रमुख पिकाची / पिकपद्धतीच्या एक किंवा दोन शेतीशाळा आयोजित कराव्यात. ज्या गावामध्ये खरीप हंगामात एकच पिकपद्धती प्रचलित आहे तेथे कृषी विद्यापीठाच्या सल्ल्याने नवीन हवामान अनुकूल पिकपद्धती घेण्याबाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे आणि त्यासाठी तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार शेतीशाळा आयोजित करावी.

१.५. खरीप हंगामात सोयाबीन + तूर या आंतरपिक पद्धतीची एक आणि कापूस + मुग/उडीद या आंतरपिक पद्धतीची एक अशा दोन शेतीशाळांचे आयोजन करावे. तथापि संबधित गावातील प्रमुख पिकरचना लक्षात घेऊन सोयाबीन व कापूस शिवाय असलेल्या इतर पिकांची शेती शाळेसाठी निवड करावी.

१.६. रबी हंगामात देखील संबधित गावातील प्रमुख पिकरचना लक्षात घेऊन शेतीशाळेसाठी एक पिकाची निवड करावी आणि त्या पिकाच्या उत्पादन वृद्धीसाठी एक शेतीशाळेचे नियोजन करावे. ज्या गावांमध्ये रबी हंगामासाठी पुरेशी भूजल पातळी उपलब्ध आहे तेथे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पिकपद्धती घेण्याबाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. अशा गावांमध्ये रबी हंगामात प्रचलित पिकपद्धती आणि नवीन पिकपद्धती अशा दोन शेतीशाळा घेता येतील.

१.७. ज्या गावामध्ये फळबागेचे क्षेत्र समूह स्वरूपात (किमान ३० शेतकरी) आहे तेथे मुख्य फळपिकासाठी शेतीशाळा आयोजित करावी. सदर शेतीशाळा खरीप व रबी हंगामातील शेतीशाळा व्यतिरिक्त असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव सोबतच्या प्रपत्रामध्येप्रकल्प संचालक (आत्मा) यांनी प्रकल्प व्यवस्थापन कक्षास मान्यतेसाठी सादर करावा. मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदर शेतीशाळेचे आयोजन करावे. मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदर शेतीशाळेचे आयोजन करावे. यासाठीच्या खर्चाचे मापदंड यथावकाश कळविण्यात येईल. **सदर शेतीशाळांचे आयोजन कृषि सहाय्यक यांनी करावयाचे आहे.यासाठी कृषि सहाय्यकांनी FFS App मध्ये नोंदी घेणे बंधनकारक राहील.**

१.८. ज्या गावामध्ये रेशीम कीटक संगोपन करणारे ३०-३५ शेतकरी आहेत तेथे "रेशीम कीटक संगोपन" या बाबीसाठी विशेष शेतीशाळा आयोजित करावी. सदर शेतीशाळा खरीप व रबी हंगामातील शेतीशाळा व्यतिरिक्त असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव सोबतच्या प्रपत्रामध्येप्रकल्प संचालक (आत्मा) यांनी प्रकल्प व्यवस्थापन कक्षास मान्यतेसाठी सादर करावा. मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदर शेतीशाळेचे आयोजन करावे.यासाठीच्या खर्चाचे मापदंड यथावकाश कळविण्यात येईल.

१.९. अमरावती, अकोला, बुलडाणा व जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यामध्ये पसरलेल्या खारपाणपट्ट्यातील गावांमध्ये प्रमुख पिकांची उत्पादकता वाढविण्याबरोबरच खारपाणग्रस्त जमिनीचे व्यवस्थापन यावर शेतीशाळेमध्ये प्रामुख्याने भर देण्यात येणार आहे.

१.१०. खालीलपैकी कोणत्याही एक किंवा अनेक तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रत्येक उपविभागामध्ये किमान पाच विशेष शेतीशाळा आयोजित करावी.

- शून्य मशागत तंत्रज्ञान
- सेंद्रिय शेती

- किडनाशक अवशेष विरहित भाजीपाला उत्पादन
- संरक्षित लागवड (शेडनेट, हरितगृह इ.)

१.११. शेतीशाळांमध्ये प्रशिक्षणासाठी पीकपद्धतीनुसार खालीलप्रमाणे वर्ग संख्या असेल.

अ. सोयाबीन + तूर: आठ वर्ग

ब. कापूस + मुग/उडीद : आठवर्ग

क. खरीपातील इतर दीर्घ कालावधीची पिके (उदा. हळद): आठवर्ग

ड. रबी पिके : सहा वर्ग

इ. भाजीपाला पिके : सहा वर्ग

फ. फळपिके : ११ वर्ग (१ वर्ष)

ह. रेशीम उद्योग : ११ वर्ग (१ वर्ष)

२. शेतीशाळेसाठी प्रक्षेत्राची आणि प्रयोगशील शेतकऱ्याची (होस्ट फार्मर) आणि गेस्ट फार्मरची निवड

२.१. शेतीशाळा घेण्याचे प्रयोजन लक्षात घेता ज्या शेतावर शेतीशाळा घ्यावयाची आहे ते शेत म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञान प्रसाराचा केंद्रबिंदू असतोपर्यायाने संबधित शेती कसणारा शेतकरी हा शेतीशाळेचा प्रमुख घटक ठरतो.शेतीशाळा घेण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्याची (Host Farmer) निवड ही अत्यंत महत्वाची कार्यवाही असून**शेतीशाळा या बाबीचीयशस्विता प्रामुख्याने योग्य शेतकऱ्याच्या निवडीवर अवलंबून आहे.**

२.२. शेतीशाळेसाठी ०.४० हे क्षेत्रावर हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करावयाचा असून सदर तंत्रज्ञान गावातील इतर शेतकऱ्यांना प्रत्येक शेतीशाळा वर्गामध्ये दाखवावयाचे असल्याने प्रयोगशील शेतकऱ्याचे **प्रक्षेत्र गावापासून जवळ आणि शेतकऱ्यांना जाणे येणे सोयीचे व्हावे अशा ठिकाणी निवडावे. केवळ जाणे येणे सोयीचे नसल्याने शेती शाळा वर्गामध्ये शेतकऱ्यांची उपस्थिती अपेक्षेप्रमाणे राहत नाही याची जाणीव ठेवून प्रक्षेत्राची निवड करावी.**

२.३. शेतीशाळा प्लॉटवरील तंत्रज्ञानाचा तौलनिक अभ्यास करता यावा आणि शेती शाळेतील शेतकऱ्यांना सदर तंत्रज्ञानअवलंब करण्याबाबत निर्णय घेता यावा यासाठी शेतीशाळा प्लॉट शेजारीच नियंत्रित प्लॉट असणे आवश्यक आहे. नियंत्रित प्लॉट देखील शक्यतो ०.४० हे क्षेत्राचा असावा. दोन्ही प्लॉटमधील जमिनीचा प्रकार सारखाच असावा. मात्र नियंत्रितप्लॉटमध्येशेतकऱ्याने नेहमीच्या पद्धतीचा/ तंत्रज्ञानाचाअवलंब चालू ठेवणे अभिप्रेत आहे.

२.४. शेतीशाळा प्लॉट धारकाकडे शेतीशाळा प्लॉटसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा असणे अभिप्रेत आहे.

२.५. हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा उत्पादकतेवर होणारा दृश्य परिणाम आजमावण्यासाठी सलग तीन वर्षातील हवामानपरिस्थितीमध्ये सदर तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक असून जमिनीच्या सुपिकतेमधील बदल व विशेषतः सेंद्रिय कर्बाचे प्रमाण (SoilOrganic Carbon) आजमावण्यासाठी देखील किमान तीन वर्षाचा कालावधी आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रथम वर्षी अवलंब केलेले तंत्रज्ञान शेतीशाळेत सहभागी इतर शेतकऱ्यांनी त्याच किंवा पुढील हंगामात स्वीकारणे अभिप्रेत आहेम्हणून **सदर प्रक्षेत्रावर सलग तीन वर्षे शेतीशाळा आयोजित करावयाची आहे.** त्याचबरोबर शेतीशाळेसाठीनिवडलेल्या प्रक्षेत्रावर तीन वर्षे एकाच पिकपद्धतीचा आणि निर्धारित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंबकरणे अभिप्रेत आहे.

२.६. शेतीशाळेसाठी प्रयोगशील शेतकऱ्याची (होस्ट फार्मर) निवड करताना जे पुरुष किंवा महिला शेतकरी प्रयोगशील आणि प्रगतीशील असून जोखीम घेण्यास तयार असतील अशा शेतकऱ्यांची पीक/पिकपद्धती निहाय यादी करावी आणि ग्राम कृषी संजीवनी समितीच्या संमतीने त्यापैकी हंगामनिहाय आवश्यकतेनुसार दोन ते तीन शेतकऱ्यांची निवड करावी.

२.७. शेतीमधील महिलांचा सहभाग आणि योगदान लक्षात घेऊन ज्या महिला स्वतः शेती कसून इतरांना देखील मार्गदर्शन करीत आहेत अशा महिला शेतकऱ्यांच्या शेतावर शेतीशाळा आयोजित केल्यास गावातील आणि परिसरातील इतर महिलांनादेखील नवीन तंत्रज्ञान अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळेल.कृषिताई यांचे प्रक्षेत्राच्या निवडीस तसेच इतरप्रयोगशील किंवा प्रगत महिला शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्र निवडीस प्राधान्यद्यावे.

२.८. **प्रत्येक उपविभागामध्ये तिसऱ्या टप्प्यातील गावांमध्ये किमान २५% शेतीशाळा "महिला शेतीशाळा" म्हणून आयोजित कराव्यात.**सदर शेतीशाळेमध्ये प्रयोगशील शेतकरी (होस्ट फार्मर) आणि इतर शेतकरी (गेस्ट फार्मर) या पूर्णतः महिला असाव्यात.

२.९. सर्व गावांमध्ये खातेदार महिलांबरोबरच ज्यांचे नावे जमीन नाही अशा काही महिला उत्तम शेती करतात आणि इतरांना देखील शेतीविषयकमार्गदर्शनकरतात. अशा प्रगत आणि प्रयोगशील महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांचा सहभाग

शेतीशाळेमध्ये वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व शेती शाळांमध्ये गेस्ट फार्मरपैकी किमान ५०% शेतकरी महिलाअसाव्यात.

२.१०. गेस्ट फार्मरच्या कमी उपस्थितीमुळे काही वर्गांची उपयुक्तता कमी होण्याची शक्यता असल्याने कोणत्याही परिस्थितीत विस्तार कौशल्याचा वापर करून शेतकऱ्यांची उपस्थिती अपेक्षित केल्यानुसार ठेवण्यात यावी. यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी स्थानिक परिस्थितीशी अनुसरून विशेष प्रयत्न करावेत.सर्वच टप्प्यातील गावांमध्ये सध्या निवडलेल्यागेस्ट फार्मर्सचा शेती शाळेमध्ये येण्याबाबतचा कल तपासून आवश्यक तेथे कृषी सहाय्यकांच्यामार्फत नवीन गेस्ट फार्मरचीनिवड करणे.

२.११. उप विभागीय कृषी अधिकारी यांनी उपविभागातील खरीप हंगामातील नियोजित शेतीशाळांचे होस्ट फार्मर आणि गेस्ट फार्मारची निवड **५ मे २०२०** पर्यंत अंतिम करावी.तसेच रबी हंगामासाठी सदर कार्यवाही दि. **३० ऑगस्ट २०२०**पर्यंत पूर्ण करावी

२.१२. शेतीशाळेसाठी खरीप २०२० मध्ये निवडलेल्या प्रक्षेत्राची **मृदचाचणी १५ मे पूर्वी**आणि रबी २०२० साठी निवडलेल्या प्रक्षेत्राची **मृदचाचणी १५ सप्टेंबर २०२० पूर्वी** करून घ्यावी.

२.१३. शेतीशाळा घेण्यासाठी निवडलेल्या शेतकऱ्याची नोंद, पूर्वसंमती आणि मानधन अदा करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

३. निवडलेल्या शेतकऱ्याची नोंदणी प्रथम प्रकल्पाच्या FFSAPP वर करणे आणि तेथेच शेतीशाळा प्रक्षेत्राची अद्यावत माहिती भरणे

४. शेतीशाळेसाठी निवडलेल्या प्रयोगशील शेतकऱ्यास प्रोत्साहनपर मानधन देण्याची तरतूद करण्यात आलेली असूनत्याबाबत संबधित अवगत करावे.

५. शेतीशाळा मानधनाबाबत https://dbt.mahapocra.gov.inसंकेतस्थळावर अर्ज करून पुढील कार्यवाही लाभाचे थेट हस्तांतरण कार्यपद्धतीच्या (DBT) मार्गदर्शक सूचनेनुसार करावी.

५.१. शेतीशाळेसाठी निवडलेल्या आणि नियंत्रित प्लॉट मधील उत्पादनाच्या नोंदी तसेच सदर उत्पादन प्राप्तीसाठी आलेला खर्च आणि मिळालेले उत्पन्न मूल्यमापनासाठी आवश्यक असल्याबाबत शेतकऱ्यास जाणीव करून द्यावी आणि तशा नोंदी ठेवण्याबाबत सदर शेतकऱ्यास मार्गदर्शन करावे.

३. शेतीशाळेसाठी प्रयोगशील शेतकऱ्यांच्या जबाबदाऱ्या(होस्ट फार्मर- प्रयोगशील शेतकरी):

३.१ शेतीशाळा आयोजित कारण्यासाठीसहमती दर्शविणे.

३.२ वेळापत्रकानुसार प्रत्येक भेटीदिवशी शेतीशाळा वर्गास उपस्थित राहणे.

३.३ हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब सलग ३ वर्षासाठी आपल्या शेतामध्ये करणे.

३.४ प्रशिक्षकाच्या सल्ल्याने पिकपद्धतीचा आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करणे .

३.५ प्रशिक्षक किंवा कृषि सहायक यांच्या सल्ल्याने तपासणीसाठी माती नमुना काढून देणे.

३.६ शेतीशाळा प्रक्षेत्रावर प्रत्येक वर्गासाठी निर्धारित केलेले शेतकरी (Guest Farmer) जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करणे.

३.७ इतर शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रवृत्त करणे.

३.८ पिकाची विविध अवस्थेमध्ये निरीक्षणे घेणे, तंत्रज्ञानाच्या उपयोगीतेबाबत निष्कर्ष काढणे, प्रत्याभरण (FEEDBACK) करणे.

३.९ शेतीशाळा प्रक्षेत्रावर गरजेनुसार व सल्ल्यानुसार संरक्षित सिंचन देणे.

३.१० कृषि हवामान सल्ल्यानुसार शेतीची कामे करणे.

३.११ नियंत्रित प्लॉटमध्ये शेतकऱ्याने नेहमीच्या पद्धतीचा/ तंत्रज्ञानाचा अवलंब चालू ठेवणे.

३.१२ शेतीशाळा प्रक्षेत्रावर व नियंत्रित प्रक्षेत्रावर वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदीवहित प्रपत्रामध्ये ठेवणे.

३.१३ शेतीशाळा प्रक्षेत्रावरील व नियंत्रित प्रक्षेत्रावरील पिकांचे पूर्ण कालावधीमध्ये केलेल्या खर्चाच्या नोंदी ठेवणे.

३.१४ शेतीशाळा समन्वयक, प्रशिक्षक व कृषि सहायक यांच्या पर्यवेक्षणाखाली पीक कापणी करणे व उत्पन्नाच्यानोंदी ठेवणे.

३.१५ शेतीशाळेस भेट देणाऱ्या अधिकारी/शेतकरी यांना माहिती देऊन सहकार्य करणे.

३.१६ प्रथम वर्षी स्वखर्चाने खरेदी केलेली निविष्ठा तसेच अनुज्ञेय प्रोत्साहनपर अनुदान यासाठी खारपाण पट्ट्याव्यतिरिक्त गावातील होस्ट फार्मर यांनी एकत्रित डीबीटी वरील **"हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेती शाळा प्रोत्साहन"**या गटातील**A२.१.१ शेतीशाळा होस्ट फार्मर प्रोत्साहनपर अनुदान** या बाबीखाली अनुदान मागणी करणे. तसेच खारपाण

पट्ट्यातील शेतकऱ्यांनी "SALINE AND SODIC LANDS" या गटातीलA२.३.३ IMPROVEMENT THROUGH IMPROVED AGRONOMIC PRACTICES FFS या बाबीखाली अनुदान मागणी करणे.

४. शेतीशाळांच्या अंमलबजावणीमध्ये समाविष्ट यंत्रणांच्या जबाबदाऱ्या

४.१. प्रकल्प संचालक, आत्मा

- वार्षिक कृती आराखड्यामध्ये शेतीशाळांचा आराखडा समाविष्ट करून जिल्हा समन्वय समितीच्या मान्यतेने प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करणे.
- प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये शेती शाळांचे नियोजन उपविभागीय कृषि अधिकारी आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र यांचे सहकार्याने करणे.
- शेतीशाळेसाठी मंजूर आराखड्यानुसार आणि उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार आवश्यक शेतीशाळा प्रशिक्षकांच्या (Facilitator) सेवा उपलब्ध करून देणे. यासाठी निर्धारित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षकांचे चमू तयार करणे.
- शेतीशाळा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे.
- शेतीशाळांचे समन्वय व सनियंत्रण करणेसाठी आणि शेतीशाळा प्रशिक्षकांना अद्यावत तांत्रिक मार्गदर्शन देणेसाठी शेतीशाळा समन्वयकांच्या सेवा उपलब्ध करून देणे. यासाठी निर्धारित केलेल्या निकषानुसार समन्वयकांचे नामनिर्देशन करणे. समन्वयकांना कामाचे वाटप (प्रशिक्षक संख्या व नावे, गावांची संख्या व नावे इ.) निर्धारित संख्येनुसार समन्वयक प्राप्त न झालेस पर्यायी व्यवस्था करणे.
- पिकनिहाय शेतीशाळांच्या वर्गामध्ये घ्यावयाचा अभ्यासक्रम कृषि विज्ञान केंद्राच्या सहाय्याने तयार करणे.
- शेतीशाळेतील शेतकऱ्यांसाठी पिकनिहाय आणि कृषि पद्धतीनिहाय हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबाबत माहिती पुस्तिका/घडीपत्रिका आणि इतर प्रकारचे प्रसिद्धी साहित्यासाठी तांत्रिक मसुदा कृषी विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र आणि शेतीशाळा समन्वयक यांच्या सहायाने तयार करणे आणि सदर साहित्याच्या आवश्यक प्रती तयार करून घेणे. यासाठी सदर घटकांतर्गत तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.
- शेतीशाळा समन्वयकांच्या कामाचा आढावा घेणे.
- कृषि विद्यापीठाचे संशोधन व विस्तारविषयक बैठकांमध्ये शेतीशाळांबाबत सादरीकरण करणे.
- जागतिक बँकेच्या तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या दौऱ्यामध्ये शेती शाळांना प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करणे आणि उत्पादनाच्या निष्कर्षाबद्दल सादरीकरण करणे.
- सदर घटकाचे मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात येणार असल्याने याबाबत संबधित यंत्रणेस आवश्यक माहिती वेळोवेळी अचूकरीत्या सादर करणे.
- **उपप्रकल्प संचालक, आत्मा हे शेतीशाळेसाठीनोडल अधिकारी (Nodal Officer) म्हणून काम पाहतील.**

४.२. उपविभागीय कृषि अधिकारी

- शेतीशाळा आराखड्यानुसार गावनिहाय व पिकनिहाय शेती शाळांचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
- शेतीशाळेसाठी प्रयोगशील शेतकऱ्याची (Host Farmer) निवड हा अत्यंत महत्वाचा टप्पा असल्याने**स्वतः लक्ष घालून**सदर निवड प्रक्रिया ग्राम कृषि संजीवनी समितीमार्फत करून घेणे.
- शेतीशाळेमध्ये सहभागी होणेसाठी निर्धारित केलेल्या पिक पद्धतीचा अवलंब करणारे आणि हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास इच्छुक असलेले इतर साधारण ३० ते ३५ गेस्ट फार्मरची (शेतकऱ्यांची) निवड करण्यासाठी संबधित गावातील कृषि सहाय्यक, समूह सहाय्यक आणि फॅसिलीटेटर यांना मार्गदर्शन करणे आणि निवड प्रक्रिया पूर्ण करून घेणे.प्रयोगशील शेतकऱ्यांची (Host Farmer) व इतर शेतकरी (Guest Farmer) यांची निवड करताना महिला/प्रगतशील महिला शेतकऱ्यांच्या निवडीस प्राधान्य देणे.
- शेतीशाळा प्रशिक्षकांना (फॅसिलीटेटर) हंगामामध्ये घ्यावयाच्या शेतीशाळांचा आराखडा (गावे, पीकपद्धती व संख्या) निश्चित करून देणे.
- शेतीशाळा समन्वयकांच्या मार्फत सदर घटकाचे चोख सनियंत्रण करणे. शेतीशाळांना वरचेवर भेटी देऊन कामाचा दर्जा उंचावण्यास प्राधान्य देणे.
- ग्राम कृषि संजीवनी समितीस संबधित गावचा/गावांचा शेतीशाळा आराखडा लेखी स्वरूपात कळविणे.
- शेतीशाळा शेतकऱ्यास (Host Farmer) त्याच्या भूमिका व जबाबदाऱ्या समजावून सांगणे.

- कृषि विज्ञान केंद्रांच्या मार्गदर्शनानुसार शेतीशाळांच्या वर्गाचे वेळापत्रक निर्धारित करणे आणि FFS APP मध्ये प्रत्येक महिन्याच्या सुरवातीस सदर वेळापत्रक**फॅसिलीटेटरनिहाय**भरणे.
- निर्धारित वेळापत्रकानुसार शेतीशाळांचे आयोजन करण्यासाठी संबधित**समुह सहाय्यक, कृषि सहाय्यक व फॅसिलीटेटर**यांना आदेशित करणे आणि त्यांचेकडून शेतीशाळांची चोख अंमलबजावणी करून घेणे. काही अपरिहार्य कारणास्तव रद्द कराव्या लागलेल्या शेतीशाळा वर्गांचे आयोजन शक्यतो सदर वर्गासाठी निर्धारित दिवसानंतर येणाऱ्या शनिवारी/रविवारी करणे व त्याबाबत संबधित शेतकऱ्यांना कळविणे.
- शेतीशाळेमध्ये प्रात्यक्षिकासाठी आवश्यक निविष्ठा संबधित शेतकऱ्यांना स्वखर्चाने वापरण्यास प्रवृत्त करणे आणि सदर निविष्ठासाठी अनुज्ञेय अनुदान DBT पद्धतीने अदा करणे. महाबीज व शासकीय संस्था /यंत्रणा यांचेकडील निविष्ठावेळेत प्राप्त करून शेतीशाळा प्रक्षेत्रावर पेरणीपूर्वी पोहचवणे.
- शेतीशाळेमध्ये आवश्यकशेतीशाळा संच (FFS Kit) व इतर साहित्याची प्रापण मार्गदर्शिकेनुसार खरेदी करून नियोजित वेळेमध्ये उपलब्धता करून देणे.
- शेतीशाळा आयोजनासाठी आवश्यक सुविधा, स्टेशनरी, अल्पोपहार व्यवस्था इ. बाबींची व्यवस्था करून देणे
- प्रत्येक शेतीशाळा वर्गास वेळापत्रकानुसार प्रशिक्षकांच्या (फॅसिलिटेटर) उपस्थितीवर FFS APP द्वारे काटेकोर सनियंत्रण करणे. शेतीशाळा सनियंत्रणासाठी एफ एफ एस ऍप (POCRA-FFS) मध्ये प्रत्येक प्रशिक्षकाच्या शेतीशाळा वर्गांचे दैनंदिन तत्वावर पडताळणी करणे आणि समन्वयकांनी गुणवत्तेबाबत नमूद केलेल्या अभिप्रायावर निर्णय घेणे. निकषानुसार गुणवत्ता राखली नसल्यास प्रशिक्षकाचे कामाबद्दल असमाधानकारक शेरा नमूद करून प्रशिक्षकास गुणवत्ता सुधारण्यास सूचना देणे.
- फॅसिलिटेटरची विनापरवाना अनुपस्थिती आढळून आल्यास तात्काळ कारवाई करणे.
- समन्वयकाच्या सहायाने **फॅसिलिटेटरचा महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी पाक्षिक आढावा घेणे.**
- शेतीशाळा समन्वयकांना आणि फॅसिलिटेटरना प्रत्येक महिन्यातील त्यांच्या कामाच्या प्रगतीनुसार **(FFS APP मधील नोंदीनुसार) अनुज्ञेय असलेले मानधन व प्रवास भत्ता** संबधिताच्या बँक खात्यावर त्यापुढील महिन्याच्या सुरवातीस वर्ग करणे. याकरिता आवश्यक रक्कम जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचेकडून बीडीएस प्रणालीद्वारे वितरीत निधीमधून GRANT-IN- AIDअंतर्गत कोषागारातून आहरीत करून घेणे आणि विहित कालमर्यादेत खर्च करणे.
- शेतीशाळेमध्ये अवलंब करण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानास व्यापक प्रसिद्धी देणे.
- हंगामाच्या अखेरीस शेतीदिनाचे आयोजन कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, कृषि संशोधन केंद्र व कृषि महाविद्यालय येथील तज्ञांच्या सहायाने करावे.
- पिक कापणी प्रयोगांचे आयोजन करणे आणि प्रत्येक शेतीशाळा प्लॉटचे व नियंत्रित प्लॉटचे उत्पादनाबाबातच्या नोंदी FFS APP मध्येशेतीशाळा प्रशिक्षक यांच्यामार्फत करणे.
- पिक कापणी प्रयोगांमध्ये आलेल्या उत्पादनाबाबत तसेच हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांशी संवाद घडवून आणणे. शेतकऱ्यांच्या अभिप्रायाबाबतच्या नोंदी ठेवणे.
- शेतीशाळांच्या माध्यमातून होणाऱ्या तंत्रज्ञान प्रसाराशी प्रकल्पाचे निर्देशांक निगडीत असल्याने सदर घटकाची प्रभावी अंमलबजावणी करणे.
- पिकनिहाय हंगामनिहाय शेतीशाळेचा समग्र अहवाल तयार करणे.
- शेतीशाळेच्या खर्चाचे लेखे स्वतंत्ररीत्या जतन करणे आणि लेखापरीक्षणाचे वेळी उपलब्ध करणे.
- शेतीशाळा घटकाचा विहित प्रपत्रातील मासिक प्रगती अहवाल जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आणि प्रकल्प संचालक (आत्मा) यांना नियमित सादर करणे.
- प्रयोगशील शेतकऱ्यास अनुज्ञेय मानधनाची अदायगी करणेसाठी DBT प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पाडणे.
- शेतीशाळा घटकातील सर्व बाबींचा खर्च वेळेत पूर्ण करणे. **क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी/ होस्ट फार्मर यांनी अल्पोपहार व इतर अनुषंगिक खर्च स्वतःहून केला असल्यास सदर खर्चाची प्राधान्याने प्रतिपूर्ती करणे.**
- शेतीशाळा वर्गांमध्ये बदलत्या वातावरणामुळे पिकावर होणारा परिणाम, किडी व रोगांचा वाढता प्रादुर्भाव, अतिपावसामुळे किंवा कमी पावसामुळे पिकावर होणारा परिणाम इ. विषयावर शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन करण्याची आवश्यकता असते यासाठी अनुभवी कृषी सहाय्यकांनातज्ञ व्याख्याते म्हणून शेतिशाळेमध्ये आमंत्रित करावे. हंगामाच्या कालावधीमध्ये प्रत्येक शेतीशाळेमध्ये २विशेष सत्रे (Special Topic) आयोजित करण्यात यावेत. विशेष व्याख्याते म्हणून सेवा घेतल्यामुळे कृषी सहायकांना रु. १०००/- प्रती सत्र याप्रमाणे मानधन अदा करण्यात यावे. सदर विशेष सत्रांची व

कृषी सहाय्यक यांच्याउपस्थितीची नोंद शेतीशाळा प्रशिक्षक यांनी एफएफएस ॲपमध्ये घेणे. त्याच्याआधारे उविकृअ यांनी कृषी सहाय्यक यांना मानधन अदा करावे.

- शेतीशाळा प्रशिक्षकांच्या अनुपस्थितीमध्ये कृषी सहाय्यकांमार्फत हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.
- ज्या उपविभागामध्ये आवश्यक पेक्षा कमी प्रशिक्षक शेतीशाळा घेण्याकरिता उपलब्ध झालेले आहेत तेथे निवड केलेल्या होस्ट फार्मरना मार्गदर्शक सूचनानुसार निविष्ठा उपलब्ध करणे आणि पिकाच्या महत्वाच्या अवस्थेमध्ये भेटी देऊन तंत्रज्ञान प्रसारासाठी काम करणे आवश्यक असल्याने तशा सूचना संबधित कृषी सहाय्यक/ कृषी पर्यवेक्षक यांना देण्यात याव्यात. त्यांनी केलेल्या कामाची नोंद (उपस्थितांची नोंद, अल्पोपहारावरील खर्च, घेतलेली निरीक्षणे, शेतीशाळेचे फोटो, केलेल्या शिफारसी, आलेले उत्पादन इ.) वेगळ्या नोंदवहीमध्ये करण्यात यावी. ज्या शेतीशाळा कृषी सहाय्यक यांचेमार्फत घेण्यात येत आहेत त्या शेतीशाळेसाठी कृषी सहाय्यक यांना विशेष सत्राचे जास्तीत जास्त रु. २०००/- शेतीशाळा इतके मानधन देय राहील.
- स्वत:च्या शेतावर जैविक खते उत्पादित करणेसाठी (ON FARM PRODUCTION OF BIOFERTILIZER) होस्ट फार्मर ना प्रवृत्त करणे व प्रशिक्षण देणे.
- पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील होस्ट फार्मरना आवश्यक निविष्ठा आणण्यासाठी प्रवृत्त करणे तसेच तिसऱ्या टप्प्यातील गावांमधील होस्ट फार्मर यांना निविष्ठा पुरवठा करणे.

४.३. कृषि विज्ञान केंद्र

- शेतीशाळा प्रशिक्षकांचे शेतीशाळेची प्रभावी अंमलबजावणी या विषयावर प्रशिक्षण घेणे सदर प्रशिक्षणासाठी प्रकल्पाच्या प्रशिक्षण धोरणानुसार खर्चाची तरतूद (प्रतिपूर्ती स्वरुपात) उपलब्ध राहील.
- हवामान आधारित कृषि सल्ला आणि पिक संरक्षणविषयक सल्ला तयार करून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , प्रकल्प संचालक (आत्मा) आणि उपविभागीय कृषी अधिकारी यांना पाठवणे.
- शेतीशाळेतील शेतकऱ्यांसाठी पिकनिहाय आणि कृषि पद्धतीनिहाय हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबाबत माहिती पुस्तिका / घडीपत्रिका आणि इतर प्रकारचे प्रसिद्धी साहित्य तयार करणेसाठी प्रकल्प संचालक, आत्मा यांना सहाय करणे.
- अचानक उद्भवणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये (कीड-रोगांचा प्रादुर्भाव, अतिवृष्टी, गारपीट इ.) शेतकऱ्यांनी तातडीने करावयाच्या उपाय योजनाबाबत सूचना प्रसारित करणे व शेतीशाळा समन्वयकांच्या सहायाने शेतकऱ्यांना एकत्रित मार्गदर्शन करणे.
- शेतीशाळा द्वारे हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार होण्यासाठी शेतीशाळा समन्वयक आणि शेतीशाळा प्रशिक्षक यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.

४.४.समूह सहाय्यक

ग्राम कृषि संजीवनी समितीस (VCRMC) शेतीशाळेसाठी प्रयोगशील शेतकऱ्याची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहकार्य करणे व त्यांची प्रकल्पाच्या (https//dbt.mahapocra.gov.in)संकेत स्थळावर online पद्धतीने नोंदणी करणे.

- शेतीशाळेस निवड केलेले इतर शेतकरी (GUEST FARMER) निर्धारित संख्येने उपस्थित राहतील यासाठी पाठपुरावा करणे.
- हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी क्षेत्रीय भेटीमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
- शेतीशाळेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शेतीशाळा समन्वयक आणि प्रशिक्षक यांचेशी समन्वय ठेवणे.
- होस्ट फार्मर व गेस्ट फार्मर यांना प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाचे घटकांबद्दल पुरेशी माहिती देणे आणि आवश्यकतेनुसार डीबीटी पोर्टलवर लाभ घेण्याच्या प्रक्रियेसाठी सहाय्य करणे.

४.५. कृषि सहाय्यक

- शेतीशाळा घेण्यासाठी गावातील शेतकऱ्यांची प्राथमिक पडताळणी करून पीकनिहाय प्रगतशील व प्रयोगशील शेतकऱ्यांची यादी तयार करणे आणि मुद्दा. क्र. २ मधील निकषांच्या आधारे सदर यादीपैकी योग्य शेतकऱ्याची निवड करण्यासाठी ग्राम कृषि संजीवनी समितीस सहकार्य करणे.
- निवडलेल्या शेतकऱ्याच्या प्लॉटचे मोबाइल एफएफएस ॲपद्वारे GEO-FENCING करणे.
- शेतीशाळेत सहभाग घेण्यासाठी आणि हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी पीकनिहाय ३०-३५शेतकऱ्यांची (गेस्ट फार्मर) निवड करणे, तसेच त्यांना प्रत्येक शेतीशाळा वर्गास उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करणे आणि त्यांचाशी वेळोवेळी संवाद साधणे.

- शेतीशाळा प्लॉटवर वापरावयाच्या निविष्ठा संबधित शेतकऱ्यास वापरण्याबाबत प्रवृत्त करणे आणि शासकीय संस्थेकडील निविष्ठांचा वेळेत पुरवठा करणे.
- शेतीशाळा आयोजनासाठी आवश्यक सुविधा जसे की स्टेशनरी, प्रात्यक्षिक साहित्य, अल्पोपहार इ. ची व्यवस्था करणे.
- पिक कापणी प्रयोगास उपस्थित राहणे आणि उत्पादनाच्या नोंदी शेतीशाळा प्रशिक्षकाकडून FFS APP मध्ये भरून घेणे.
- प्रयोगशील शेतकऱ्यास अनुज्ञेय मानधनाची अदायगी करणेसाठी DBT प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पार पाडणे.
- ज्या गावांसाठी शेतीशाळा प्रशिक्षक उपलब्ध नाहीत अशा गावांमध्ये पिकाच्या महत्वाच्या अवस्थेमध्ये भेटी देऊन तंत्रज्ञान प्रसारासाठी काम करणे व केलेल्या कामाची नोंद (उपस्थितांची नोंद, अल्पोपहारावरील खर्च, घेतलेली निरीक्षणे, शेतीशाळेचे फोटो, केलेल्या शिफारसी, आलेले उत्पादन इ.) नोंदवहीमध्ये ठेवणे.
- मुद्दा क्र. ४.२ मध्ये नमूद केलेनुसार आवश्यकतेनुसार शेतीशाळा वर्गाना भेट देऊन विशेष सत्र घेणे. यासाठी मानधनाची तरतूद उपलब्ध आहे. शेतीशाळा वर्गांमध्ये बदलत्या वातावरणामुळे पिकावर होणारा परिणाम, किडी व रोगांचा वाढता प्रादुर्भाव, अतिपावसामुळे किंवा कमी पावसामुळे पिकावर होणारा परिणाम इ. विषयावर शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन करण्याची आवश्यकता असते यासाठी हंगामाच्या कालावधीमध्ये प्रत्येक शेतीशाळेमध्ये २ विशेष सत्रे (Special Topic) घेणे. यासाठी विशेष व्याख्याते म्हणून रु. १०००/- प्रती सत्र याप्रमाणे मानधन देय आहे.
- फळबाग व रेशीम कीटक संगोपन यासाठीशेतीशाळा आयोजित करणे व निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार आणि ठरलेल्या दिनांकास शेतीशाळा वर्ग आयोजित करणे.

४.६. शेतीशाळा समन्वयक

शेतीशाळा घटकाची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेची असल्याने हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा या विस्तार पद्धतीचे समन्वय, सनियंत्रण आणि मूल्यमापन तितकेच महत्वाचे आहे. तसेच प्रभावी अंमलबजावणी करिता शेतीशाळा प्रशिक्षकांचे तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य अद्यावत करणेदेखील महत्वाचे ठरते. म्हणूनच प्रत्येक उपविभागामध्ये शेतीशाळांचे समन्वय व सनियंत्रण करणेसाठी आणि शेतीशाळा प्रशिक्षकांना अद्यावत तांत्रिक मार्गदर्शन देणेसाठीमानधन तत्वावर **शेतीशाळा समन्वयकाच्या**सेवा प्रकल्प संचालक आत्मा यांनी प्राप्त कराव्यात. उपविभागनिहाय शेतीशाळा समन्वयकांची संख्या सहपत्रीत करण्यात आलेली आहे.

अ.शेतीशाळा समन्वयकासाठी अर्हता व अनुभव

- कृषि विद्यापीठ/ कृषि संशोधन संस्था/ कृषि विज्ञान केंद्र येथे कार्यरत कृषि विद्या/ फलोत्पादन/ पीकसंरक्षण / कृषी विस्तार/ मृदा विज्ञान विषयातील तज्ञ
- कृषि विद्यापीठ/ कृषि संशोधन संस्था/ कृषि विज्ञान केंद्रामधून सेवानिवृत्त शास्त्रज्ञ
- कृषि विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी
- कृषि विस्तार कामाचा किमान दोन वर्षे अनुभव असलेले कृषि विद्या/फलोत्पादन / पीकसंरक्षण/कृषी विस्तार/ मृदा विज्ञान विषयातील पदव्युत्तर पदवीधारक
- कृषी विस्तार कामाचा किमान ५ वर्षे अनुभव असलेले कृषी पदवीधारक

ब. शेतीशाळा समन्वयकाची जबाबदारी

- प्रकल्पांतर्गत गावांमध्ये घेण्यात येत असलेल्या प्रमुख पिकांचा अभ्यास करून संबधित पिकाबाबत कृषि विद्यापीठ आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) अंतर्गत कृषि संशोधन संस्थानी केलेल्या शिफारसींचे संकलन करणे आणि प्रकल्प क्षेत्रासाठी पिकनिहाय अद्यावत पॅकेज ऑफ प्रॅक्टिसेस तयार करणे.
- पिकनिहाय तयार केलेल्या पॅकेज ऑफ प्रॅक्टिसेसचा प्रसार करणेसाठी घडीपत्रिका/ माहिती पुस्तिका व इतर माध्यमांसाठी तांत्रिक मसुदा (technical content) तयार करणे.
- शेतीशाळा प्रशिक्षकांचा प्रत्येक महिन्यामध्ये पहिल्या व तिसऱ्या शनिवारी उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालयामध्ये आढावा घेणे.
- दरमहा प्रत्येक प्रशिक्षकाचे किमान २ शेतीशाळावर्गाना भेटी देवून प्रशिक्षकांच्या कामाची पाहणी करणे आणि मार्गदर्शन करणे वत्याची नोंद एफएफएस ॲपमध्ये करणे.
- शेतीशाळा सनियंत्रणासाठी एफ एफ एस ऍप (POCRA- FFS) मध्ये प्रत्येक प्रशिकाचे शेतीशाळा वर्गांचे दैनंदिन तत्वावर पडताळणी करावी व नमूद निकषानुसार सदर वर्गाची गुणवत्ता ठरविणे:

- शेतीशाळा प्रशिक्षकांना प्रत्येक हंगामामध्ये पिकनिहाय हवामान अनुकूल तंत्रज्ञानाबाबत उजळणी प्रशिक्षण देणे.
- हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांकडून अवलंब व्हावा यासाठी प्रयत्नशील राहणे.
- प्रत्येक प्रशिक्षकाकडील प्रती माह किमान २ गेस्ट फार्मर यांना भेटून शेतीशाळेच्या माध्यमातून त्यांनी अवलंब केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती घेणे व त्याची एफएफएस ॲपमध्ये नोंद करणे.
- शेतीशाळाबाबत शेतकऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये -किड/रोगांचा प्रादुर्भाव, पावसातील खंड, दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यावर मार्गदर्शन करणे.
- शेतीशाळा प्लॉट आणि नियंत्रित प्लॉट मधील उत्पादनाचे नोंदीसाठी पीक कापणी प्रयोगांचे संपूर्ण सनियंत्रण करणे.
- प्रत्येक शेतीशाळा यशस्वी होण्यासाठी प्रशिक्षकांकडून प्रभावी विस्तारकार्य करून घेणे.
- प्रत्येक शेतीशाळेचे डॉक्यूमेंटेशन करून घेणे आणि उपविभागाचा पिकनिहाय संकलित अहवाल तयार करणे.
- आपत्कालीन पीक आराखडा तयार करणे साठी कृषि विज्ञान केंद्र व उप विभागीय कृषि अधिकारी यांना सहाय करणे.
- संशोधन व विस्तार आराखडा (STRATEGIC RESEARCH AND EXTENSION PLAN) तयार करावयाच्या प्रक्रियेमध्ये सक्रीय सहभाग दर्शवणे.
- कृषि विद्यापीठ व भारतीय हवामान विभाग यांचेकडून प्राप्त होणाऱ्या कृषि हवामान सल्ल्याचे स्थानिक परिस्थितीनुसार विश्लेषण करून शेतीशाळा शेतकऱ्यांपर्यंत प्रसारित करणे.
- हवामान अनुकूल वाणांच्या बिजोत्पादन कार्यक्रमास भेटी देऊन तांत्रिक मार्गदर्शन करणे व एफएफएस ॲपमध्ये नोंद करणे.
- शेतीशाळा प्रशिक्षकांच्या कामाच्या प्रगतीबाबत उप विभागीय कृषि अधिकारी यांना मासिक अहवाल सादर करणे.
- शेतीशाळेच्या अंमलबजावणी नंतर प्रभावी ठरलेल्या तंत्रज्ञानाचा अहवाल तयार करणे.
- प्रकल्प संचालक (आत्मा) यांना प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उपविभागातील शेतीशाळा अंमलबजावणीबाबत प्रशिक्षकनिहाय आणि शेतीशाळा निहाय प्रगतीचा आढावा सादर करणे.
- शेतीशाळा प्रशिक्षक यांचेकडून प्रत्येक प्लॉटचे योग्य/वास्तविक मिळालेले उत्पादन एफएफएस ॲपमध्ये भरून घेणे.
- शेतीशाळा प्रशिक्षक यांनी एफएफएस ॲपमध्ये मृदा तपासणी अहवालानुसार भरलेली माहिती पडताळणी करणे.
- प्रत्येक हंगामातील होस्ट फार्मरच्यामानधनासाठीDBT प्रणालीवर नोंद केल्याची खात्री करणे.
- स्वत:च्या शेतावर जैविक खते उत्पादित करणेसाठी (ON FARM PRODUCTION OF BIOFERTILIZER) होस्ट फार्मर ना प्रवृत्त करणे व प्रशिक्षण देणे.

क. शेतीशाळा समन्वयकांना मानधन

- प्रस्तुत प्रकल्पांतर्गत शेतीशाळा घटक अंमलबजावणीसाठी माहे मे २०२० ते मार्च २०२१ या कालावधीसाठी शेतीशाळा समन्वयकांच्या कामाचा कालावधी राहील.
- प्रशिक्षकांची संख्या व भौगोलिक सलगता विचारात घेऊन शेतीशाळा समन्वयक यांना शेतीशाळांचे आवंटन करण्यात यावे.
- शेतीशाळा समन्वयकास नेमून दिलेल्या प्रशिक्षकांचे कामाचे समन्वय करणेसाठी प्रवास खर्चासह रु. २००० प्रती शेतीशाळा या प्रमाणे मानधन देय राहील. सदर मानधनामध्ये समन्वयासाठी व प्रशिक्षणासाठी करण्यात आलेल्या प्रवास खर्चाचा समावेश आहे.
- खरीप हंगामासाठी केलेल्या कामाचे मानधन माहे मे २०२० ते ऑक्टोबर २०२० पर्यंत देय राहील. रबी हंगामासाठी केलेल्या कामाचे मानधन माहे नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ पर्यंत देय राहील.
- शेतीशाळा समन्वयक यांचे प्रती माह मानधनाची गणना खालीलप्रमाणे करण्यात येईल.
  १. खरीप हंगामासाठी प्रती माह मानधन = खरीप हंगामातील एकूण आवंटीतप्लॉट X २०००/ ६ महिने
  २. रबी हंगामासाठी प्रती माह मानधन = रबी हंगामातील एकूण आवंटीत प्लॉट X २०००/ ५ महिने
- शेतीशाळा समन्वयक यांचे प्रती माहे मानधन उपविभागीय कृषी अधिकारी यांनी एफएफएस ॲपमध्ये मंजूर करून मानधन बिल (HONORARIUM BILL) FFS DASHBOARD वरून डाऊनलोड व प्रिंट करावे. मानधन बिलानुसार मानधनाची अदायगी संबधित समन्वयकाच्या बँक खातेवर करण्यात यावी.
- एफएफएस ॲपमधील शेतीशाळा तपासणी अहवाल,गेस्ट फार्मरने अवलंब केलेल्या हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा तपासणी अहवालइ. नोंदीच्या आधारे मानधन अदायगी करावी.

ड. समन्वयकाच्या कामांचे मूल्यमापन

उपविभागीय कृषी अधिकारी यांनी समन्वयकास नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या व केलेल्या कामांचा वेळोवेळी आढावा घ्यावा. ज्या समन्वयकांनी त्यांचे अधिनस्त गावांमध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांकडून व्यापक प्रमाणात अवलंब करून घेतला आहे त्यांची प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे प्रशस्तीपत्रासाठी शिफारस करण्यात यावी.

४.७. शेतीशाळा प्रशिक्षक(FACILITATOR)

शेतीशाळा अंमलबजावणीसाठी आणि हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी शेतीशाळा प्रशिक्षकांचा चमू तयार करण्यात येणार आहे. सदर चमूकडून खालीलप्रमाणे विस्तार कार्य अपेक्षित आहे. शेतीशाळा प्रशिक्षक संख्या सहपत्रीत केलेनुसार राहील.

- हवामान अनुकूल कृषि तंत्रज्ञान प्रसारासाठी नेमून दिलेल्या गावांमध्ये शेतीशाळेचे आयोजन करणे.
- हवामान अनुकूल वाणांच्या बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे.
- शेतीशाळा व्यतिरिक्त प्रकल्पांतर्गत विविध पिकांसाठी शिफारस केलेल्या हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रसार नेमून दिलेल्या गावामध्ये करणे.
- प्रतिकूल हवामान परिस्थितीमध्ये आपत्कालीन पीक आराखड्याची अंमलबजावणी करून घेणे .

शेतीशाळा प्रशिक्षक चमू गठीत करण्यासाठी कार्यपद्धती

- प्रकल्प संचालक (आत्मा) यांचेमार्फत "शेतीशाळा प्रशिक्षक" (FACILITATOR) म्हणून कृषी पदवीधारक/पदविकाधारक युवक/युवती तसेच कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्र/कृषि विभागातून सेवानिवृत्त तज्ञ किंवा अधिकारी यांची निवड संपूर्णतः मानधन तत्वावर करण्यात येईल.
- प्रकल्प संचालक (आत्मा), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तज्ञ/शास्त्रज्ञ (कृषी विज्ञान केंद्र/कृषि विद्यापीठ) व शेतीशाळा समन्वयक यांची समिती तयार करण्यात यावी. सदर समितीने प्राप्त अर्जदारांची लेखी परीक्षा व मुलाखत घेण्यात यावी. त्यानुसार गुणानुक्रमे (मेरीटनुसार) जिल्ह्यानिहाय आवश्यक संख्येइतक्या प्रशिक्षकांची निवड करावी. तसेच यापूर्वीच्या अनुभवानुसार प्रतीक्षा यादी तयार ठेवावी. शेतीशाळा चमूची निवड ही १५ मे २०२० पर्यंत पूर्ण करावी.
- निवडण्यात आलेल्या फॅसिलीटेटरना शेतीशाळा व इतर विस्तार कार्य करण्यासाठी कृषी विद्यापीठ/ कृषी विज्ञान केंद्र यांचे सहकार्याने आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे.

फॅसिलिटेटरची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

प्रत्येक शेतीशाळा वर्गामध्ये प्रशिक्षकास गावे नेमून देण्यात येतील. सदर गावांमध्ये प्रशिक्षकाने (FACILITATOR) खालील कामे करणे अनिवार्य आहे. शेतीशाळा वर्गामध्ये निर्धारित संख्येइतकी गेस्ट फार्मरची उपस्थिती ठेवणे ही शेतीशाळा प्रशिक्षकाची प्रमुख जबाबदारी आहे. त्याबरोबरच शेतीशाळामध्ये महिला शेतकऱ्यांचा सहभाग जास्तीत जास्त प्रमाणात राहील यासाठी विषेस प्रयत्न करणे हीदेखील शेतीशाळा प्रशिक्षकाची जबाबदारी आहे.

१. हवामान अनुकूल कृषि तंत्रज्ञान प्रसारासाठी शेतीशाळेमध्ये प्रशिक्षक म्हणून काम पाहणे.
२. निवडलेल्या शेतकऱ्याच्या प्लॉटचे मोबाइल एफएफएस ॲपद्वारे GEO-FENCING करणे. शेतीशाळा वर्ग हे GEO-FENCING केलेल्या प्लॉट वर घेणे अनिवार्य आहे.
३. पिकांचे कालावधीत निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार आणि ठरलेल्या दिनांकास शेतीशाळा वर्ग आयोजित करणे.
४. शेतीशाळेसाठी निश्चित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब शेतीशाळा शेतकरी (HOST FARMERS)आणि इतर सहभागी शेतकऱ्यांकडून करून घेणे.
५. शेतीशाळा आयोजित करावयाच्या प्रक्षेत्रावरील मातीचा नमुना तपासून घेणे व त्यानुसार शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे. मृद चाचणी अहवाल मधील माहिती एफएफएस ॲपमध्ये नोंद करणे.
६. शेती शाळेतील शेतकऱ्यांना पीक संरक्षणविषयक सल्ला देणे.
७. शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या समस्यांबद्दल कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांना अवगत करून त्यांचेकडून प्राप्त माहिती व उपाय तात्काळ संबधित शेतकऱ्यांना कळविणे, तसेच सुचविलेल्या तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांनी केलेल्या अवलंबाबाबत नोंदी घेणे.
८. शेतीशाळा शेतकऱ्यास निर्धारित केलेल्या निविष्ठा वापरण्यास प्रवृत्त करणे व त्याची नोंद एफएफएस ॲपमध्ये करणे.
९. शेतीशाळेतील पिक कापणीच्या वेळी व्यक्तीशः उपस्थित राहून उत्पादनाच्या नोंदी घेणे.

१०. प्रात्यक्षिक प्लॉट आणि नियंत्रित प्लॉट मधील निरीक्षणे आणि उत्पादनाच्या नोंदी वेगवेगळ्या ठेवणे.

११. शेतीशाळा वर्गाचे संपूर्ण डॉक्युमेंटेशन हे मोबाईल वरून FFS ॲप्लिकेशन वापरून पूर्ण करणे.

१२. महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी उप विभागीय कृषि अधिकारी स्तरावरील पाक्षिक आढावा बैठकीस उपस्थित राहणे

१३. शेतीशाळेचा अहवाल तयार करून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/प्रकल्प संचालक (आत्मा)/उप विभागीय कृषि अधिकारी /वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र यांचेसमोर सादरीकरण करणे.

१४. शेतीशाळा वर्ग संपन्न झालेनंतर त्याचदिवशी गावातील बीजोत्पादन प्लॉटला भेटी देणे व त्याची निरीक्षणे एफएफएस ॲपमध्ये नोंदविणे आणि शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.

१५. शेतीशाळा शेतकरी (होस्ट फार्मर) आणि बीजोत्पादक शेतकरी यांची DBT पोर्टल वर नोंदणी करणेसाठी समूह सहायकांना सहकार्य करणे.

१६. उप विभागीय कृषि अधिकारी यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली शेतीशाळेचे कामकाज पाहणे.

१७. शेतकरी प्रशिक्षणासाठी उप विभागीय कृषि अधिकारी व कृषि विज्ञान केंद्र यांना सहकार्य करणे.

१८. प्रकल्पांतर्गत गावसमुहासाठी तयार केलेला आपत्कालीन पीक आराखडा नेमून दिलेल्या गावामधील शेतकऱ्यांना समजावून सांगणे आणि आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास सदर आराखड्याची अंमलबजावणी करून घेणे.

१९. प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TRAINING OF FACILITATOR)पूर्ण करणे.

२०. शेतीशाळा वर्गांमध्ये प्रात्यक्षिक दाखविण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाचे शेतीशाळा वर्गांमध्ये उपस्थित राहणाऱ्या शेतकऱ्यांनी सदर तंत्रज्ञानाचा स्वत:च्या शेतामध्ये अवलंब केला आहे का याबाबतची माहिती एफएफएस ॲपमध्ये भरणे.

२१. शेतीशाळा प्लॉट व नियंत्रित प्लॉट चे तुलनात्मकउत्पादन खर्च (COST OF CULTIVATION) तयार करणे.

२२. हवामान अनुकूल वाणांच्या बियाणांच्या वापराबाबत प्रसार करणे तसेच बिजोत्पादन कार्यक्रमाचे सनियंत्रण करणे.

२३. प्रकल्पांतर्गत विविध पिकांसाठी शिफारस केलेल्या हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करणे.

२४. गावांसाठी तयार केलेल्या आपत्कालीन पीक आराखड्याची अंमलबजावणी करणे.

कामाचा कालावधी व पद्धत :

१. प्रशिक्षक चमूची निवड माहे मे २०२० ते माहे मार्च २०२१ या कालावधीकरिता कार्यरत राहील. याबाबत चमूतील प्रशिक्षकांकडून लेखी हमी घ्यावी.

२. शेतीशाळा वर्गाचे आयोजन आठवड्यातील सोमवार ते शुक्रवार या ५ दिवसांसाठी करावे. काही अपरिहार्य कारणामुळे एखादे दिवशीचा वर्ग घेता येत नसल्यास उपविभागीय कृषी अधिकारी यांचे परवानगीने चुकलेला वर्ग त्याच आठवड्यातील शनिवारी किंवा रविवारी पूर्ण करावा. मात्र ही बाब अपवादात्मक परिस्थितीतच लागू राहील.

३. शेतीशाळा वर्गाची वेळ सकाळी ८.०० ते १२.०० अशी राहील.

४. खरीप व रबी हंगामामध्ये आवंटीत केलेल्या गावामध्ये उविकृअ यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार शेतीशाळा वर्ग आयोजित करावेत.

५. हंगामनिहाय व पिकनिहाय महत्वाच्या अवस्थांचा विचार करून कृषी विज्ञान केंद्र/ कृषी विद्यापीठातील तज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शकानुसार उपविभागीय कृषी अधिकारी यांनी पिकनिहाय शेतीशाळा वर्गांचे वेळापत्रक तयार करावे. मुद्दा क्र. १.११ नुसार शेतीशाळा वर्गांची संख्या निर्धारित करावी.

६. सदर वेळापत्रक FFS DASHBOARD वर तयार करावे. सदर वेळापत्रक प्रत्येक वर्गाच्या २ आठवडे आगोदर FFS DASHBOARD वर भरण्यात यावे. तसेच वेळापत्रकानुसार प्रशिक्षकांचे वर्ग प्रकल्प सहाय्यक (कृषी), प्रकल्प विशेषज्ञ (कृषी) यांनी वेळोवेळी सनियंत्रण करावे.

मानधन: शेतीशाळा प्रशिक्षकास गुणवत्ता पूर्ण शेतीशाळा वर्ग आयोजित केल्यानंतर रु.१०००/- प्रति शेतीशाळा वर्ग इतके मानधन देय राहील. प्रवास व संपर्क खर्चासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये रु. ३००/- प्रति वर्ग तरतूद करण्यात आलेली आहे . मानधन अदायगीसाठी फक्त FFS APP मधील नोंदी ग्राह्य धरण्यात येतील. प्रवास व संपर्क खर्चाच्या तरतुदीमध्ये लाभार्थी निवड, माती नमुने घेणे, प्रत्यक्ष शेतीशाळा वर्ग घेणे, आपत्कालीन परिस्थितीमध्ये उविकृ यांचे निर्देशानुसार भेटी देणे, आढावा बैठकांना उपस्थित राहणे, कृषी विज्ञान केंद्र किंवा कृषी विद्यापीठ किंवा रामेति येथे विशेष कार्यशाळा / प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणे, जागतिक बँक /प्रकल्प व्यवस्थापन कक्ष/ जिल्हास्तरीय अधिकारी यांचे दौऱ्यामध्ये उपस्थित राहणे इ. प्रवासासाठी होणारा खर्च आणि मोबाईल ॲप्लिकेशनसाठी आवश्यक डाटा चार्जेसचा खर्च समाविष्ट आहे .

४.८. ग्राम कृषि संजीवनी समिती

- शेतीशाळेसाठी प्रगत व प्रयोगशील शेतकऱ्याची निवड करणे व समितीच्या बैठकीमध्ये मंजुरी देणे.
- शेतीशाळा यशस्वी होण्यासाठी कृषि सहाय्यक, समूह सहाय्यक आणि फॅसिलीटेटर यांना सहकार्य करणे
- शेतीशाळेतील हवामान अनुकूल तंत्रज्ञान, त्याचा वापर, फलनिष्पत्ती याबाबत मासिक बैठकीमध्ये आढावा घेणे आणि त्याबाबत ग्रामसभेस अवगत करणे.
- हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब व्यापक प्रमाणावर होण्यासाठी प्रयत्न करणे.
- हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा वर्गामध्ये महिलांची उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

४.९. कृषिताई व कृषिमित्र यांचा सहभाग

शेतीशाळेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती करणे अत्यंत महत्वाचे आहे. याकरिता प्रत्येक गावासाठी कार्यरत असलेले कृषिताई व कृषिमित्र यांना शेतीशाळेच्या प्रत्यक्ष आयोजनामध्ये सहभागी करून घ्यावे. शेतीशाळेसाठी प्रयोगशील शेतकऱ्याची व प्रक्षेत्राची निवड, इतर ३० ते ३५ गेस्ट फार्मर यांची निवड,तसेच या सर्व शेतकऱ्यांची शेतीशाळा वर्गामध्ये उपस्थिती, शेतीशाळेतील निरीक्षणे व नोंदी, तातडीने द्यावयाच्या कृषिविषयक सल्ल्याचा प्रसार इ. बाबींची कार्यवाही करणे कृषिताई व कृषिमित्र यांनी सक्रीय सहभाग नोंदवावा.कृषी ताई यांच्या जबाबदारी मध्ये शेतीशाळा वर्गास महिला शेतकऱ्यांची उपस्थिती वाढविणे हे प्रामुख्याने समाविष्ठ आहे आणि त्यानुसार कृषी ताईंच्या कामांचे मासिक मुल्यांकन करण्यात येणार आहे.

५. शेतीशाळेमध्ये अवलंब करावयाचे हवामान अनुकूल तंत्रज्ञान

पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी स्थानिक कृषि हवामान पद्धतीचा विचार करून प्रकल्प क्षेत्रातील प्रमुख पिकांसाठी कृषि विद्यापीठाने व राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांनी विकसित केलेले, National Innovation In Climate Resilient Agriculture (NICRA) या प्रकल्पामध्ये अवलंबलेले, प्रयोगशील शेतकऱ्यांनी अवलंबलेले आणि कृषि विज्ञान केंद्रांनी पडताळणी केलेले हवामान अनुकूल तंत्रज्ञान निश्चित करून त्याचा काटेकोरपणे अवलंब करण्यासाठी शेती शाळेतील सहभागी शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. NICRA प्रकल्पांतर्गत अवलंबलेल्या प्रमुख तंत्रज्ञानाचे निष्कर्ष उदाहरणादाखल पुढील तक्त्यामध्ये देण्यात येत आहेत.

हवामान अनुकूल तंत्रज्ञान	हवामान अनुकुलता वैशिष्ट्ये व फायदे
१. हवामान अनुकूल वाणांचा वापर	जमिनीतील ओलाव्याच्या ताणास सहनशिलता, खारपाण जमिनीत क्षारतेस सहनशीलता
२. समतल मशागत व पेरणी	अपधावाचे व्यवस्थापन आणि जमिनीतील ओलावा व जमिनीची सुपीकता वृद्धी
३. बी बी एफ तंत्रज्ञानाने लागवड	जमिनीमधील ओलावा टिकणे, अतिपावसामुळे निर्माण झालेल्या जादा पाण्याचा निचरा, पिकांच्या मुळांभोवती हवा खेळती राहणे
४. आंतरपीक पद्धती	हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीमुळे निर्माण होणारी जोखीम कमी, जमिनीच्या सुपिकातेमध्ये वृद्धी
५. कमी/शून्य मशागत	जमिनीतील कार्बामध्ये वृद्धी, जमिनीतील ओलावा टिकून राहणे, उत्पादन खर्चामध्ये कपात
६. एक आड एक किंवा दुसऱ्या/ चौथ्या ओळीनंतर सारी काढणे	कोरडवाहू शेतीमध्ये पावसाचे पाणी जमिनीत साठविण्या मदत
७. बंदिस्त सरी	पावसाचे पाणी मुर्विन्यास मदत होते, जमिनीतील ओलावा टिकून राहतो

८. आच्छादनाचा वापर	जमिनीतील ओलावा टिकून राहणे,
९. हिरवळीच्या खताचा वापर	जमिनीच्या सुपिकतमध्ये वृद्धी, सेंद्रिय कर्ब वाढण्यास मदत .
१०. भूसुधाराकांचा वापर	जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे, पिकांची क्षारास सहनशीलता वाढवणे
११. एकात्मिक कीड व्यवस्थापन	उत्पादन खर्चामध्ये बचत, रासायनिक किडनाशाकांचा वापर कमी, किडींमध्ये रासायनिक प्रतिकारशक्ती कमी
१२. सूक्ष्म सिंचन	पाण्याची बचत, पिकास आवश्यक तेवढेच पाणी मिळते
१३. संरक्षित सिंचन	पावसाचा खंड पडल्यास संवेदनशील अवस्थेमध्ये
१४. संरक्षित लागवड	वातावरणातील बदलापासून पिकांचे संरक्षण, कमी क्षेत्रावर अधिक उत्पादन, पाण्याची बचत
१५. फळझाडांचा आकार मर्यादित ठेवणे(Canopy Management)	पाण्याची गरज कमी, झाडाच्या घेरामध्ये सूर्यप्रकाशाची उपलब्धता अधिक

उपरोक्त तंत्रज्ञानाशिवाय स्थानिक पातळीवर कृषी विद्यापीठ/ कृषी विज्ञान केंद्राच्या सल्ल्याने जे तंत्रज्ञान वातावरणातील बदलास अनुकूल ठरलेले आहे, असेही तंत्रज्ञान शेती शाळेमध्ये अवलंबण्यात यावे.खारपाणपट्ट्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब प्रत्येक शेती शाळा प्लॉटवर करून घेण्यात यावा. तसेच बीबीएफ तंत्रज्ञानाचा प्रत्येक प्रकल्प गावामध्ये शेतिशाळेमध्ये अवलंब करणे अनिवार्य आहे. यासाठी बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देणेसाठी प्रशिक्षण या घटकाखाली तरतूद देण्यात आलेली आहे (संदर्भ: या कार्यालयाचे दि. २७/०४/२०२० चे पत्र क्र.३२५).

६. शेतीशाळेतील प्रात्यक्षिकासाठी वापरावयाच्या निविष्ठा

शेतीशाळेसाठी निश्चित करण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी काही अत्यावश्यक निविष्ठांची (Critical Inputs) गरज असते. शेतीशाळा प्लॉट साठी ०.४० हे क्षेत्रावर आवश्यक असलेल्या निविष्ठासाठी प्रथम वर्षी १००% अर्थसहाय देण्यात यावे. निविष्ठा अंतर्गत हवामान अनुकूल बियाणे याबाबीसाठी रु. ३०००/- प्रती प्लॉट, एकात्मिक अन्नद्रव्ये व कीड व्यवस्थापन या बाबीसाठी रु २०००/- प्रती प्लॉट असे मापदंड मंजूर आहेत. खारपान पट्ट्यातील गावांसाठी सदर २ बाबीशिवाय भूसुधाराकांच्या वापरासाठी रु. १४०००/- प्रती प्लॉट असा मापदंड मंजूर आहे. तदनंतरच्या दोन वर्षामध्ये संबधित प्रयोगशील शेतकऱ्याने स्वखर्चाने वापरावयाच्या आहेत. तरी याबाबत संबधित शेतकऱ्यास स्पष्ट जाणीव करून द्यावी. ज्या शेतीशाळा प्लॉटचे चालू वर्ष हे दुसरे किंवा तिसरे आहे त्या प्लॉटसाठी संबधित होस्ट फार्मरने मागील हंगामामध्ये शेतीशाळेसाठी वापरलेल्या निविष्ठांचा चालू वर्षी स्व:खर्चाने वापर करावयाचा आहे याबाबतदेखील स्पष्ट जाणीव द्यावी आणि सदर निविष्ठांचा तसेच तंत्रज्ञानाचा अवलंब होत आहे याबाबत खात्री करण्यात यावी.तिसऱ्या टप्प्यातील गावांमध्ये (प्रथम वर्ष) शेतीशाळा घटकांतर्गत वापरावयाच्या निविष्ठांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. प्रयोगशील शेतकऱ्याच्या (Host Farmer) ०.४० हे क्षेत्रासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक निविष्ठा जसे की हवामान अनुकूल वाणाचे बियाणे, जैविक खते, जैविक कीडनाशके इ. चा तसेच खारपाणग्रस्त गावांमध्ये शेतीशाळा प्रक्षेत्रासाठी भूसुधारके यांचा संच कृषि विद्यापीठाचे शिफारशीनुसार जिल्हास्तरावर कृषि विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावा.

२. उपविभागीय कृषी अधिकारी यांनी निविष्ठांचीमागणी महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र आणि कृषि विभागाच्या प्रयोगशाळायांचेकडे नोंदवावी आणि तालुका/ गावसमूह पातळीवर सदर निविष्ठांचा पुरवठा

करण्याबाबत पुरवठा यंत्रणेस निर्देशित करावे. कोणत्याही परिस्थितीत पेरणीपूर्वी शेतीशाळा प्रक्षेत्रावर निविष्ठा पोहचतील याबाबत दक्षता घ्यावी. विशिष्ट परिस्थितीमध्ये शेतीशाळा प्रक्षेत्रावर निविष्ठा पोहचविण्यासाठी अतिरिक्त वाहतूक खर्च करावा लागल्यास सदर खर्च शेतीशाळेसाठीच्या तरतुदीमधून संकीर्ण बाबीखाली भागविण्यात यावा.

३. विविध कृषि विद्यापीठे आणि संशोधन संस्थामार्फत हवामान अनुकूल वाणांचे संशोधन सुरु असून प्रकल्प जिल्ह्यांकरिता शिफारशीत केलेल्या वाणांपैकी शेतीशाळेसाठी प्राधान्याने पुढील वाणांचा वापर करण्यात यावा. यापैकी काही वाण शेतकऱ्यांच्या शेतावर लागवडीसाठी नवीन आहेत तर काही वाणांच्या लागवडीसाठी काही विशिष्ट कृषीपद्धतीचा (PACKAGE OF PRACTICES) अवलंब करावा लागतो.या बाबींचा विचार करून संबधित वाणाच्या पैदासकाराच्या किंवा विशेषज्ञांच्या पर्यवेक्षणाखाली त्या वाणाची प्रात्यक्षिके घेण्याबाबत कृषी विद्यापीठ आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने अनुकुलता दर्शविली आहे. तरी प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी याबाबत तज्ञांशी चर्चा करून अशा विशेष शेती शाळांचे आयोजन करावे.

पिकाचे नाव	कृषि विद्यापिठनिहाय हवामान अनुकूल वाण		
	वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी	डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
कापूस (ARBORIUM)	PA २५५, PA ५२८	AK २०५-३,	JLA ५०५
कापूस (HIRSUTUM)	NH ६१५	AKH- ९९१६	-
कापूस (संकरीत)	NHH २५० (NON BT) NHH ४४ (BT)	JKAKL-११६ (BT) PKV HY-२ (BT.)	-
कापूस (बीटी)	NH ६१५	CICR : AKH ०८१, AKH ९९१६	-
	CICR : GJHV ३७४ BT, RAJAT BT(CICR BT-२), SURAJ BT(CICR BT-१), AK-३२ BT.,		
सोयाबीन	MAUS- ६१२, MAUS-७१ (SAMRUDDHI), MAUS-१५८, MAUS-१६२	AMS-१००१, JS-९५-६०	DS २२८
	महाबीज : JS २०२९, JS-९३-०५		
तूर	BDN ७१६, BDN ७११	AKPHM - ११३०३ (संकरीत) AKT-८८११ (सुधारित वाण), PKV-TARA	PHULE-१२
मूग	BM-२००३-२	AKM १२-१८ ,PKV-AKM-४	महाबीज : उत्कर्षा
उडीद	-	PDKV BLACK GOLD	-
हरभरा	आकाश, BDN ७९८	जाकी ९२१८, पी के व्ही काबुली ४-१	फुले विक्रम, फुले विक्रांत, दिग्विजय, विराट, विजय, कृपा

	इतर कृषि विद्यापीठ / संशोधन संस्था : राज विजय- २०२, राज विजय-२०३,		
रबी ज्वारी	परभणी मोती , परभणी ज्योती	पी के व्ही क्रांती	फुले वसुधा, फुले अनुराधा, फुले सुचित्रा, फुले रेवती, मालदांडी

४. उपरोक्त वाणांच्या बियाण्याची उपलब्धता कमी असल्यास कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्र/महाबीज यांचे सल्ल्याने इतर हवामान अनुकूल वाणाचे बियाणे प्राप्त करून घ्यावे. तसेच मागील हंगामातील शेतीशाळा प्लॉटमध्ये ज्या वाणांची उत्पादकता कमी आढळली आहे अशा वणांच्या वापराबाबत संबधित पैदासकार, कृषी विद्यापीठ/कृविके येथील शास्त्रज्ञ व महाबीज येथील तज्ञ यांचेशी संपर्क ठेवून निर्णय घेण्यात यावा.

५. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी मृद तपासणी अहवाल शेतीशाळेच्या पहिल्या वर्गामध्ये उपस्थित शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात यावा. कमतरता असलेल्या अन्नद्रव्यांसाठी शिफारशीनुसार खतांचा वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे.आवश्यकतेनुसार अन्नद्रव्ये पुरवठा करण्याच्या दृष्टीने जमीन आरोग्य पत्रिका व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार जैविक व रासायनिक खतेआणि सूक्ष्म मूलद्रव्ये यांचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे.तसेच खारपाण पट्ट्यामध्ये भूसुधारकांचा वापर करणेसाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यात यावे. शेतीशाळा प्लॉटवर भूसुधारकांची उपलब्धतता करण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रापण मार्गदर्शिकेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. खारपाण पट्ट्यातील शेतीशाळा प्लॉटवर भूसुधारके वापरण्याकरिता रु. १४०००/- प्रती शेतीशाळा अशी प्रथम वर्षाकरिता तरतूद केलेली आहे. खारपाण पट्ट्यातील शेतीशाळा प्लॉटवर प्रथम वर्षी भूसुधारकांचा वापर करणे अपेक्षित होते परंतु मागील २ वर्षाच्या अनुभवानुसार भूसुधारके उपलब्ध होऊ न शकणे, प्रापण पद्धतीमधील काही तांत्रिक अडचणी यामुळे शेतीशाळा प्लॉटवर त्याचा अपेक्षित वापर झालेला नसल्याचे आढळून येत आहे. खारपाण पट्ट्यातील जमिनीची सुपीकता वाढविणे हा प्रकल्पाचा निर्देशांक असून त्यासाठी प्रकल्प कालावधीमध्ये भूसुधारकांचा वापर करणे आवश्यक आहे म्हणून प्रथम वर्षातील ज्या प्लॉटवर भूसुधाराकांचा वापर केलेला नाही त्या प्लॉटवर सन २०२०-२१ मध्ये भूसुधारके वापरले जातील अशी दक्षता घ्यावी. आणि त्यासाठी प्रथम वर्षाकरिता अखर्चित राहिलेला मंजूर मापदंड रु. १४०००/- प्रती शेतीशाळा याप्रमाणे खर्च करण्यात यावा.

७. शेतीशाळा प्रक्षेत्रासाठी कृषि विभागाच्या जैविक कीड नियंत्रक प्रयोग शाळेकडून द्रवरूप जीवाणू संघाचा (महाएनपीके- Liquid Consortium) पुरवठा करण्यात यावा. यामध्ये नत्र स्थिरीकरण करणारे, स्फुरद विरघळविणारे व जस्त विरघळविणारे जीवाणू यापैकी कमीत कमी दोन किंवा अधिक जीवाणूंचा समावेश असतो. सदर जैविक खतांची बीजप्रक्रिया केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन पिकांच्या उत्पादकतेत वाढ होते.

८. हवामान बदलामुळे विविध कीडरोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने कीडनाशकांवरील खर्च वाढत चालला आहे. परिणामी पिकांच्या उत्पादन खर्चामध्ये वाढ होत आहे. शेती शाळेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे महत्व पटवून देणे ही प्रशिक्षकाची प्रमुख जबाबदारी आहे.

९. किडींच्या प्रादुर्भावाबद्दल अचूक माहिती मिळण्यासाठी फेरोमोन सापळ्यांचा वापर अनिवार्य आहे. यासाठी कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार शेतीशाळेतील प्रात्यक्षिक प्रक्षेत्रासाठी आवश्यक फेरोमोन सापळ्यांचा वापर करण्यास होस्ट फार्मर यांना प्रवृत्त करावे. सदर फेरोमोन सापळ्यांची खरेदी प्रस्तुत घटकांतर्गत करण्यात येऊ नये. तथापि आवश्यकतेनुसार कृषि विभागाच्या इतर योजनांशी सांगड घालण्यात यावी.

१०. किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीवर गेल्यास नियंत्रणासाठी रासायनिक कीडनाशकांचा वापर अनिवार्य ठरतो. कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार व लेबल क्लेमनुसार केंद्रीय कीड नाशके मंडळाने मान्यता दिलेल्या रासायनिक कीडनाशकांचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षित करावे. कीडनाशकांचे लेबल क्लेमwww.cibrc.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

११. जागतिक आरोग्य संघटनेने CLASS IA आणि CLASS IB वर्गीकृत केलेले तसेच केंद्र शासनाने बंदी घातलेले किडनाशाकांचा वापर करता येणार नाही तसेच CLASS II वर्गीकृत केलेल्या किडनाशकांचावापर करताना पुरेशी काळजी घेण्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी. याबरोबरच शेतकऱ्यांना कीडनाशकांची 'जनेरिक' नावाने शिफारस करावी.

१२. तसेच रासायनिक कीडनाशकावरील खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना जैविक कीडनाशकाचा वापर करणेबाबत प्रवृत्त करावे. तिसऱ्या टप्प्यातील गावामधील शेतीशाळांसाठी एकात्मिक कीड नियंत्रण या बाबींतर्गत जैविक

कीडनाशकाचा पुरवठा करण्यात यावा. यासाठी कृषी विभागाच्या जैविक कीड नियंत्रक प्रयोगशाळा, कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र या उत्पादकांकडूनच जैविक कीडनाशकाची खरेदी करण्यात यावी.

७. शेतीशाळा प्रशिक्षकासाठी प्रशिक्षणसंच

शेतीशाळा वर्गामध्ये प्रशिक्षक आणि शेतकरी यांना निरीक्षणे घेण्यासाठी (AESA) आणि सदर शिक्षणपद्धती परिणामकारक होण्यासाठी काही प्रशिक्षण साहित्याची आवश्यकता असते. यासाठी खालीलप्रमाणे साहित्याची उपलब्धता करून दयावी. यासाठी रु. १५००/- प्रती शेतीशाळा असा मापदंड मंजूर आहे.

अ.क्र	प्रशिक्षणास आवश्यक साहित्य	प्रति संच नग संख्या
अ.	प्रशिक्षकाचे सोबत ठेवावयाचे साहित्य	एक संच प्रती प्रशिक्षक
१	रेक्सिन टेप ३० मीटर	१ नग
२	१० X चे भिंग	१ नग
३	साहित्यसाठी पाठीवरची किंवा हातातील बॅग (POCRA लोगोसह)	१ नग
ब.	शेतीशाळा प्रक्षेत्रावर ठेवावयाचे साहित्य	एक संच प्रती शेतीशाळा प्लॉट
४	हजेरी व इतर कामासाठी रजिस्टर १०० पाने	१ नग
५	फूट पट्टी	१ नग
६	स्केच पेन सेट (१ डझन)	५ नग
७	कोरे कागद (A४ साईज)	१ रीम
८	लहान व्हायल्स (७.५ X २.५ सें. मी. झाकणासह)	१० नग
९	ड्रॉइंग कागद	३५ नग
१०	टोपी (PoCRA लोगोसह) (शेतकऱ्यांसाठी)	३० नग
११	कापूस वेचणी कोट (कापूसप्लॉटसाठी)(कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी, नांदेड यांचेउत्पादन)	१ नग
१२	पीक कापणी हातमोजे(सोयाबीन/ हरभराप्लॉटसाठी) (कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी, नांदेड यांचेउत्पादन)	१ नग

टीपः

१. एफएओ मार्फत आयोजित टीओएफ प्रशिक्षित शेतीशाळा तज्ञांचे सूचनेनुसार इतर बाबींचा आवश्यकतेनुसार समावेश करता येईल.

२. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रापण मार्गदर्शिकेनुसार सदर साहित्य खरेदी करावे आणि आवश्यकतेनुसार प्रशिक्षकांनाउपलब्ध करून देण्यात यावे. वापरलेल्या साहित्याबद्दल योग्य त्या नोंदी ठेवण्यात याव्यात. जर प्रशिक्षक काम सोडून जात असेल तर त्याचेकडून संचातील वस्तू परत घेण्यात याव्यात आणि त्या ठिकाणी नव्याने काम करणाऱ्या प्रशिक्षकास सदर संच वापरण्यास देण्यात यावा.

३. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी कापूस वेचणी कोट वपीक कापणी हातमोजे या वस्तूंची मागणी कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी, नांदेड यांचेकडे नोंदवण्यात यावी. कापूस वेचणी/ पीककापणीचे पूर्वीच्या शेतीशाळा वर्गामध्ये या वस्तूंच्या वापराबाबत मार्गदर्शन करावे.

४. शेतीशाळा प्रशिक्षकाने शेतीशाळा संच व इतर बाबी प्रगतशील शेतकरी (Host Farmer) याचे शेतघरात प्रत्येक प्रशिक्षणाचे वेळी वापरासाठी सुरक्षित ठेवाव्यात.

५. फळबाग वरेशीम शेतीशाळेसाठी प्रशिक्षण संचामध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

८. माहितीपर तांत्रिक साहित्य

शेतीशाळा आयोजित करण्यामागील महत्वाचा उद्देश हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करणे आणि त्यायोगे शेतकऱ्यांचे क्षमतेमध्ये वृद्धी करणे असा असून त्यासाठी कृषी बिद्यापीठ आणि इतर कृषी संशोधन संस्थांनी केलेल्या पिकनिहाय शिफारशींची माहिती शेंतकऱ्यांना होणे गरजेचे आहे. यासाठी शेतकऱ्यांना त्यांचे भाषेत तांत्रिक माहितीपर साहित्य

उपलब्ध करून देण्यात यावे. यासाठीच्या खर्चासखर्चाचे मापदंडमध्ये तरतूद केलेली आहे. असे साहित्य कृषी विद्यापीठ / कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांच्या तांत्रिक सल्ल्याने तयार करावे. पिकनिहाय तयार करावयाच्या तांत्रिक माहितीपर साहित्यामध्ये किमान खालील मुद्दे समाविष्ट करावेत.

- प्रस्तावना- हवामान अनुकूल कृषि पध्दतीचे महत्व व गरज
- पीक / पीक पध्दतीचे महत्व (आंतरपिक इ.)
- मुलस्थानी जलसंधारण उपाययोजना / कमी मशागत / शुन्य मशागत तंत्रज्ञान
- बीबीएफ चा वापर
- माती परिक्षण व त्यानुसार अन्नद्रव्य व्यवस्थापन,
- सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठीच्या उपाययोजना
- हवामान अनुकुल वाण व त्यांचे गुणधर्म, बियाण्याची निवड, बीज प्रक्रिया
- लागवड / पेरणी पध्दती
- एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन - कीड सर्व्हेक्षण व व्यवस्थापन, पक्षी थांबे, मित्र किडींची ओळख व संवर्धन, शत्रु किडींची ओळख, आर्थिक नुकसान पातळी व बंदोबस्ताच्या उपाययोजना
- पिकाच्या वाढीच्या महत्वाच्या अवस्था, पाण्याची गरज आणि सिंचन पध्दती, संरक्षित सिंचन
- कोरडवाहू क्षेत्रात पावसात दिर्घ काळ खंड आल्यास करावयाच्या उपाययोजना
- पिकाची काढणी व काढणीत्तोर व्यवस्थापन इ.

९. शेतीशाळेतील पिकांच्याउत्पादनाच्या नोंदी व काढणी

शेतीशाळेतील तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठीचे शेतीशाळा आणि नियंत्रित प्लॉटवर पेरणीपासून कालक्रमानुसार वापरलेल्या निविष्ठांच्या आणि त्यासाठी आलेल्या खर्चाच्या तारीखवार नोंदी ठेवाव्यात. शेतीशाळा समन्वयक अशा सर्व नोंदींची खातरजमा करतील. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी समूह सहाय्यक/कृषि सहाय्यक यांचेकडून ग्राम कृषि संजीवनी समिती सदस्यांच्या (किमान दोन) उपस्थितीत शेतीशाळा व नियंत्रित प्रक्षेत्रातील पिकाचे संख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन आलेल्या उत्पादनाच्या विश्लेषणात्मक नोंदी पुढील प्रपत्रात ठेवाव्यात.**सदर उत्पादनाच्या नोंदी FFS APP मध्ये भरणे अनिवार्य आहे.** पीक कापणी प्रयोगासाठी केलेली तरतूद मुख्य सांख्यिकी, कृषि आयुक्तालय यांचेकडील मार्गदर्शक सूचनांनुसार खर्च करण्यात यावी.

शेतीशाळा क्षेत्रातील पीक कापणी प्रयोगानुसार उत्पादन अहवाल

गाव:------ गावसमूह :------- तालुका:---------- जिल्हा:----------

शेतकऱ्याचे नाव	प्रात्यक्षिक प्लॉटमधील एकुण खर्च	पारंपारीकपध्दतीचे प्लॉटमधील एकुण खर्च	प्रात्यक्षिकप्लॉटमधीलउत्पादन (क्विंटल/हे)	पारंपारीकपध्दतीचेप्लॉटमधीलउत्पादन (क्विंटल/हे)	बाजारभावानुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे)		प्रात्यक्षिकप्लॉटमधील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (रु./हे)
					शेतीशाळा प्लॉटमधील	पारंपारीक पध्दतीने	

१०. शेतीदिन

शेतीशाळेमध्ये अवलंब केलेल्या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रचार करणेसाठी प्रत्येक गावसमूहामध्ये एक दिवसीय शेतीदिनाचे आयोजन करावे. यासाठी कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्र/कृषि संशोधन केंद्र /कृषि महाविद्यालय येथील तज्ञांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित करावे. शेतीदिनामध्ये किमान ५० % महिलांचा सहभाग होईल याबाबत दक्षता

घेण्यात यावी. शेतीदिनामध्ये होस्ट फार्मर्सना त्यांचे अनुभव कथन करण्यास प्रवृत्त करावे तसेच कोणते तंत्रज्ञान जास्त उपयुक्त ठरले याबाबत चर्चा घडवून आणावी. शेतीदिनासाठी प्रतीशेतीशाला निर्धारित केलेला निधी गावसमूह स्तरावर एकत्रित करून विहित वित्तिय नियमानुसार खर्च करण्यात यावा.

११. शेतीशाळा अहवाल, प्रचार व सादरीकरण

उपविभागीय कृषी अधिकारी यांनी शेतीशाळा या बाबीचा शेतीशाळा समन्वयक यांच्या मदतीने वार्षिक अहवाल तयार करावा. यामध्ये शेतीशाळा आयोजनासाठी केलेले प्रयत्न व आलेले यश तसेच अधिक प्रभावी अंमलबजावणीबाबत सूचना याबाबत सविस्तर विवेचन असावे. शेतीशाळा वर्गांमध्ये आढळलेली महत्वाची निरीक्षणे आणि त्यावेळी शेतकऱ्यांनी घेतलेले निर्णय याबाबतची शास्त्रीय कारणमीमांसा हवामान अनुकूल तंत्रज्ञानाच्या प्रसारामध्ये महत्वाची ठरणार असल्याने सदर बाबी अहवालांकित कराव्यात.

उपविभागनिहाय शेतीशाळा अहवालामध्ये समाविष्ट करावयाचे मुद्दे

१. शेतीशाळा संकल्पना व कार्यपद्धती
२. परिसंस्था विश्लेषण- कृषि परिसंस्था, जमिनीचे आरोग्य,
३. पिक/ पीकपद्धतीचे विश्लेषण- पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता, कमी उत्पादकतेची कारणे
४. सद्यस्थितीत तंत्रज्ञानाचा अवलंब
५. शेतीशाळेमध्ये प्रसारित करण्यात येणारे तंत्रज्ञान
६. शेतीशाळा अभ्यासक्रम - वर्गनिहाय तंत्रज्ञान
७. शेतीशाळा वर्गांचे वेळापत्रक
८. शेतीशाळा प्रयोगशील शेतकऱ्यांची (Host Farmer) माहिती
९. शेती शाळेतील इतर शेतकऱ्यांची (Guest Farmers) यादी
१०. शेतीशाळा वर्गांचे आयोजनाची ठळक वैशिष्ट्ये
११. पिकाच्या विविध अवस्थांमधील निरीक्षणे (वर्गनिहाय)
१२. शेतीशाळा वर्गांमध्ये दिलेल्या सूचना (अवस्थानिहाय)
१३. हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब
१४. शेतीशाळा प्लॉट व तुलनात्मक प्लॉट मधील निरीक्षणे
१५. फलनिष्पत्ती
१६. शेतीशाळा प्रशिक्षकांचा तपशील
१७. महत्वाचे फोटो

वरील मुद्द्यांची माहिती उपविभागात राबविलेल्या शेतीशाळाचा सारांश स्वरुपात असावी. मुद्दा क्र. १३, १४, १५ याबाबतच्या माहितीमध्ये समन्वयक व उपविभागीय कृषी अधिकारी यांनी वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे अपेक्षित आहे.

शेतीशाळा प्रसिद्धी:शेतीशाळेमध्ये अवलंब करण्यात आलेल्या तंत्रज्ञानाचा विविध प्रसार माध्यमातून व्यापक प्रसार करण्यात यावा. तसेच सदर तंत्रज्ञानाविषयीची माहिती आणि शेतीशाळा प्लॉटचा तपशिल नमुद केलेला फलक प्लॉटशेजारी दर्शनी भागात लावण्यात यावा व त्यावर पुढीलप्रमाणे माहिती नमूद करावी.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा

१) गावाचे नाव:
२) शेतकऱ्याचे नाव :
३) पीक व वाण:
४) हवामान अनुकूल तंत्रज्ञान :
५) बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर:
६) पेरणीची तारीख:
७) सहभागी शेतकरी संख्या:

८) कृषि सहाय्यकाचे नांव:
९) कृ.स. संपर्क क्रमांक:
१०)प्रशिक्षकाचे नाव:
११) प्रशिक्षकाचा संपर्क क्र.
१२) कृषि विज्ञान केंद्राचे नाव:

१२. उत्कृष्ट शेतीशाळा आयोजनासाठी प्रोत्साहन

शेतीशाळा प्रशिक्षकांच्या कामाचे मुल्यांकन करून उत्कृष्ट शेतीशाळा घेणाऱ्या प्रशिक्षकास प्रोत्साहन दिल्यास प्रशिक्षकांमध्ये उत्साह निर्माण होऊन सदर घटकाचा उद्देश सफल होण्यास मदत होईल. त्याद्दष्टीने पूर्ण हंगामामध्ये(खरीप व रबी) जिल्हास्तरावर एक व उपविभागीय स्तरावर एक उत्कृष्ट शेतीशाळा प्रशिक्षकांची निवड करण्यात यावी. यासाठी जिल्हास्तरावर एक पथक तयार करण्यात यावे. सदर पथकाचे **प्रकल्प उपसंचालक (आत्मा)** हे प्रमुख असतील तसेच प्रकल्प विशेषज्ञ (कृषी), कृषी विज्ञान केंद्राचे तज्ञ, संबधित उपविभागाचे प्रकल्प सहाय्यक व समन्वयक हे इतर सदस्य राहतील. प्रत्येक समन्वयक यांनी त्यांच्या अधिनस्त शेतीशाळा प्रशिक्षकांपैकी उत्कृष्ट काम करणाऱ्या ३ शेतीशाळा प्रशिक्षकांची नावे सदर पथकाकडे शिफारस करावी. सदर पथकानेसमन्वयक यांनी शिफारस केलेल्या शेतीशाळा प्रशिक्षकांच्या शेतीशाळांचे वेळोवेळी शेतीशाळा वर्गांना भेटी देऊन तसेच प्रशिक्षकांनी एफएफएस ॲपमध्ये भरलेल्या माहितीच्या आधारे आणि शेतकऱ्यांचे अभिप्राय घेऊन मुल्यांकन करावे आणि शेतीशाळा प्रशिक्षकांचे गुणांकन करावे. हंगामाच्या शेवटी उपविभागीय स्तरावर एका प्रशिक्षकाची निवड करावी. उपविभागांमध्ये उत्कृष्ट ठरलेल्या प्रशिक्षकांपैकी जिल्हास्तरावर एक उत्कृष्ट प्रशिक्षकाची निवड करावी ज्या जिल्ह्यामध्ये एकच उपविभाग आहे त्या जिल्ह्यात फक्त जिल्हास्तरावर एकाच प्रशिक्षकाची निवड करावी. उत्कृष्ट प्रशिक्षकास प्रशस्तीपत्र व खालीलप्रमाणे रोख पारितोषिक देणेत येणार आहे. पारितोषिकासाठी लागणारा खर्च प्रचार व प्रसिद्धी या घटकाखाली उपलब्ध तरतुदीतून करण्यात यावा.

१. जिल्हास्तरावर : रु. १००००/- चे पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देण्यात यावे.
२. उपविभागीय स्तरावर : रु. ५०००/- चे पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देण्यात यावे.

१३. निधीची तरतूद

- प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकाऱ्यांना प्रकल्पाच्या विविध बाबींसाठी निधी वितरीत केला जाईल. सदर निधीमध्ये शेतीशाळेसाठी निधीचासमावेश असेल.
- प्रकल्पाच्या विविध बाबीवर खर्च करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी उपविभागीय कृषी यांना निधी वितरीत करतील. सदर निधीमध्ये शेतीशाळेसाठीच्या निधीची तरतूद असेल.
- शेतीशाळा बाबीचा खर्च उपविभागीय कृषी स्तरावर प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने मान्य केलेल्या मापदंडानुसार करण्यात यावा.
- शेतीशाळा आयोजनासाठी मंजूर बाबींचे स्वरूप पाहता यामध्ये मानधन, प्रवासखर्च, अल्पोपहार, निविष्ठा इ. तात्काळ खर्च करावयाच्या बाबी समाविष्ट असल्याने उपविभागीय कृषी अधिकारी यांनी GRANT-IN-AID चे देयक सादर करून कोषागारातून निधी आहरीत करून खर्च करावा.

ब. शेतीशाळा या बाबीसाठी मंजूर संकेतांक खालीलप्रमाणे आहे.

१. खारपाण पट्ट्याव्यतिरिक्त गावांसाठी

घटक : A. हवामान अनुकूल कृषि पद्धतीस प्रोत्साहन
उपघटक: A.२ हवामान अनुकूल कृषि पद्धती
बाब :A.२.१ हवामान अनुकूल आधुनिक शेती तंत्रज्ञानाची प्रात्याक्षिके (शेतीशाळा)
A २.१.१. हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा

२. खारपाण पट्ट्यातील गावांसाठी

घटक : A. हवामान अनुकूल कृषि पद्धतीस प्रोत्साहन
उपघटक: A.२ हवामान अनुकूल कृषि पद्धती
बाब :A.२.१ हवामान अनुकूल आधुनिक शेती तंत्रज्ञानाची प्रात्याक्षिके (शेतीशाळा)
A.२.३.३ हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर (हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा)

ब. शेतीशाळा खर्चाचे मापदंड

सन २०१८-१९ मध्ये निर्धारित मापदंड व प्रत्यक्ष खर्चाचा आढावा घेतला असता काही बाबींवरील खर्च हा कमी होताना दिसून येत आहे तसेच काही नवीन बाबीसाठी खर्च करणे आवश्यक असल्याचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केले आहे. या बाबीचा विचार करून सन २०२०-२१ मध्ये तिन्ही टप्प्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या गावांमध्ये शेतीशाळेसाठी करावयाच्या खर्चाचे मापदंड खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहेत. सदर बदल सन २०२०-२१ मधील प्रत्यक्ष खर्चासाठी लागू राहतील.

हंगाम	शेतीशाळा प्रकार	खर्चाचे कमाल मापदंड (रु.)			
		प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष	तृतीय वर्ष	एकूण
खरीप	खारपाण पट्ट्याव्यतिरिक्त गावांसाठी	३४६००	२९६००	२९६००	९३८००
	खारपाण पट्ट्यातील गावांसाठी	४८६००	२९६००	२९६००	१०७८००
रबी	खारपाण पट्ट्याव्यतिरिक्त गावांसाठी	३०८००	२५८००	२५८००	८२४००
	खारपाण पट्ट्यातील गावांसाठी	४४८००	२५८००	२५८००	९६४००

क. शेतीशाळा बाबीसाठी खर्चाचे मापदंडाचा तपशील पुढीलप्रपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे.

शेतकऱ्यांची शेतीशाळा बाबीसाठी खर्चाचे मापदंड

१. खरीप शेतीशाळा

अ. खारपाण गावे वगळून इतर गावांसाठी मापदंड (०.४० हे)						
अ.क्र.	**उपक्रम / बाब**	**युनिट**	**मापदंड (रु.)**			
			प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष	तृतीय वर्ष	एकूण
१	हवामान अनुकूल बियाणे व तंत्रज्ञानाचा वापर	निविष्ठा किंमत, भाडे इ.	३०००	०	०	३०००
२	एकात्मिक अन्नद्रव्य व कीड व्यवस्थापन	निविष्ठा किंमत	२०००	०	०	२०००
३	शेतीशाळा संच	संच किंमत	१५००	१५००	१५००	४५००
४	अल्पोपहार (३० शेतकरी, ८ वर्ग)	रु. ४०/-व्यक्ती	८४००	८४००	८४००	२५२००
५	होस्ट फार्मरसाठी प्रोत्साहनपर अनुदान	एक शेतकरी प्रति शेतीशाळा	२८००	२८००	२८००	८४००
६	समन्वयकासाठी मानधन	रु. २००० प्रति शेतीशाळा	२०००	२०००	२०००	६०००
७	प्रशिक्षकाचे मानधन (८ वर्गांसाठी)*	रु. १००० प्रति वर्ग	८०००	८०००	८०००	२४०००
८	प्रशिक्षकासाठी प्रवास व संपर्क खर्च (८ वर्गांसाठी)	रु. ३००/-व्यक्ती	२४००	२४००	२४००	७२००
९	विशेष सत्र (Special Topic)	रु. १०००/- प्रती सत्र (२ सत्रांकरिता)	२०००	२०००	२०००	६०००
१०	माहितीपर साहित्य,पीक कापणी, शेतीदिन, सनियंत्रण भेटीसाठी इंधन खर्च, विश्लेषणात्मक अहवाल तयार करणेव इतर अनुषंगिक खर्च	-	२,५००	२,५००	२,५००	७५००
	एकूण		**३४६००**	**२९६००**	**२९६००**	**९३८००**

	आ. खारपाण गावांसाठी मापदंड (०.४० हे)					
अ.कृ.	उपक्रम / बाब	युनिट	मापदंड (रु.)			
			प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष	तृतीय वर्ष	एकूण
१	खारपाण जमीन सुधारण्यासाठी भूसुधाराकांचा व इतर तंत्रज्ञानाचा वापर	निविष्ठा किंमत, भाडे इ.	१४०००	०	०	१४०००
२	हवामान अनुकूल बियाणे व तंत्रज्ञानाचा वापर	निविष्ठा किंमत, भाडे इ.	३०००	०	०	३०००
३	एकात्मिक अन्नद्रव्य व कीड व्यवस्थापन	निविष्ठा किंमत	२०००	०	०	२०००
४	शेतीशाळा संच	संच किंमत	१५००	१५००	१५००	४५००
५	अल्पोपहार (३० शेतकरी, ८ वर्ग)	रु. ४०/-व्यक्ती	८४००	८४००	८४००	२५२००
६	होस्ट फार्मरसाठी प्रोत्साहनपर अनुदान	एक शेतकरी प्रति शेतीशाळा	२,८००	२,८००	२,८००	८४००
७	समन्वयकासाठी मानधन	रु. २००० प्रति शेतीशाळा	२०००	२०००	२०००	६०००
८	प्रशिक्षकाचे मानधन (८ वर्गांसाठी)*	रु. १००० प्रति वर्ग	८०००	८०००	८०००	२४०००
९	प्रशिक्षकासाठी प्रवास व संपर्क खर्च (८ वर्गांसाठी)	रु. ३००/- प्रति व्यक्ती प्रति वर्ग	२४००	२४००	२४००	७२००
१०	विशेष सत्र (Special Topic)	रु. १०००/- प्रती सत्र (२ सत्रांकरिता)	२०००	२०००	२०००	६०००
११	माहितीपर साहित्य, पीक कापणी, शेतीदिन, सनियंत्रण भेटीसाठी इंधन खर्च, विश्लेषणात्मक अहवाल तयार करणेव इतर अनुषंगिक खर्च	-	२,५००	२,५००	२,५००	७५००
	एकूण		**४८६००**	**२९६००**	**२९६००**	**१०७८००**

२. रबी शेतीशाळा

	अ. खारपाण गावे वगळून इतर गावांसाठीमापदंड (०.४० हे)					
अ.क्र.	उपक्रम / बाब	युनिट	मापदंड (रु.)			
			प्रथमवर्ष	द्वितीयवर्ष	तृतीयवर्ष	एकूण
१	हवामान अनुकूल बियाणे वतंत्रज्ञानाचा वापर	निविष्ठा किंमत, भाडे इ.	३०००	०	०	३०००
२	एकात्मिक अन्नद्रव्य वकीड व्यवस्थापन	निविष्ठा किंमत	२०००	०	०	२०००
३	शेतीशाळा संच	संच किंमत	१५००	१५००	१५००	४५००
४	अल्पोपहार (३० शेतकरी, ६ वर्ग)	रु. ४०/-व्यक्ती	७२००	७२००	७२००	२१६००
५	होस्ट फार्मरसाठीप्रोत्साहनपर अनुदान	एक शेतकरी प्रति शेतीशाळा	२८००	२८००	२८००	८४००

६	समन्वयकासाठीमानधन	रु. २००० प्रति शेतीशाळा	२०००	२०००	२०००	६,०००
७	प्रशिक्षकाचे मानधन (६ वर्गांसाठी)*	रु. १००० प्रति वर्ग	६०००	६०००	६०००	१८,०००
८	प्रशिक्षकासाठी प्रवास व संपर्क खर्च (६ वर्गांसाठी)	रु. ३००/-व्यक्ती	१८००	१८००	१८००	५४००
९	विशेष सत्र (Special Topic)	रु. १०००/- प्रती सत्र (२ सत्रांकरिता)	२०००	२०००	२०००	६०००
१०	माहितीपर साहित्य, पीक कापणी, शेतीदिन, सनियंत्रण भेटीसाठी इंधन खर्च, विश्लेषणात्मक अहवाल तयार करणेव इतर अनुषंगिक खर्च	-	२५००	२५००	२५००	७५००
	एकूण		३०८००	२५८००	२५८००	८२४००

	आ. खारपाण गावांसाठी मापदंड (०.४० हे)					
अ.कृ.	उपक्रम / बाब	युनिट	मापदंड (रु.)			
			प्रथमवर्ष	द्वितीयवर्ष	तृतीयवर्ष	एकूण
१	खारपाण जमीनसुधारण्यासाठी भूसुधाराकांचाव इतर तंत्रज्ञानाचा वापर	निविष्ठा किंमत, भाडे इ.	१४०००	०	०	१४०००
२	हवामान अनुकूल बियाणे वतंत्रज्ञानाचा वापर	निविष्ठा किंमत, भाडे इ.	३०००	०	०	३०००
३	एकात्मिक अन्नद्रव्य वकीड व्यवस्थापन	निविष्ठा किंमत	२०००	०	०	२०००
४	शेतीशाळा संच	संच किंमत	१५००	१५००	१५००	५०००
५	अल्पोपहार (३० शेतकरी, ६ वर्ग)	रु. ४०/-व्यक्ती	७२००	७२००	७२००	२१६००
६	होस्ट फार्मरसाठीप्रोत्साहनपर अनुदान	एक शेतकरी प्रतिशेतीशाळा	२८००	२८००	२८००	८४००
७	समन्वयकासाठीमानधन	रु. २००० प्रतिशेतीशाळा	२०००	२०००	२०००	६,०००
८	प्रशिक्षकाचे मानधन (६ वर्गांसाठी)*	रु. १००० प्रति वर्ग	६०००	६०००	६०००	१८,०००
९	प्रशिक्षकासाठी प्रवास व संपर्क खर्च (६ वर्गांसाठी)	रु. ३००/-व्यक्ती	१८००	१८००	१८००	५४००
१०	विशेष सत्र (Special Topic)	रु. १०००/- प्रती सत्र (२ सत्रांकरिता)	२०००	२०००	२०००	६०००
११	माहितीपर साहित्य, पीक कापणी, शेतीदिन, सनियंत्रण भेटीसाठी इंधन खर्च, विश्लेषणात्मक अहवाल तयार करणेव इतर अनुषंगिक खर्च	-	२,५००	२,५००	२,५००	७५००
	एकूण		४४८००	२५८००	२५८००	९६४००

१४. सनियंत्रण व मूल्यमापन

सदर प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व घटक, उपघटक आणि बाबींची अंमलबजावणी कार्यपद्धती आणि फलनिष्पत्ती आजमावण्यासाठी जागतिक बँकेच्या निर्देशानुसार त्रयस्थ यंत्रणेमार्फत सहामाही सनियंत्रण आणि वार्षिक/त्रैवार्षिक तसेच प्रकाल्पांती मूल्यमापन करण्यात येणार आहे. सनियंत्रण करताना शेतीशाळा बाब राबविताना अवलंबलेली कार्यपद्धती मार्गदर्शक सूचनानुसार आहे किंवा कसे याबाबतची माहिती घेतली जाणार असून त्यासाठी रँडम पद्धतीने होस्ट आणि गेस्ट फार्मर यांची निवड केली जाणार आहे. तसेच मूल्यमापनासाठी हंगामाच्या / वर्षाच्या अखेरीस त्याच पद्धतीने शेतकऱ्यांची निवड करून आवश्यक माहिती संकलित केली जाणार आहे. शेतीशाळा घटकाचे मूल्यमापनासाठी खालील निर्देशांक निर्धारित केलेले आहेत.

अ.क्र.	प्रकल्प निर्देशांक	निर्देशांक काढण्यासाठी आधारभूत माहिती
१	हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब	शेतीशाळेमध्ये अवलंबलेल्या तंत्रज्ञानाचा त्याच किंवा पुढील हंगामात स्वीकार केलेल्या शेतकऱ्यांची संख्या
२	पिकांच्या उत्पादकतेमधील स्थैर्य	शेतीशाळा आणि नियंत्रित प्लॉट मधील पिकाचे /पिकपद्धतीचे सलग तीन वर्षातील उत्पादन (कि /हे)
३	वार्षिक उत्पन्नाचे तौलनिक प्रमाण	शेतीशाळा प्लॉट आणि नियंत्रित प्लॉट मधील उत्पन्नाचे तौलनिक प्रमाण (वाढ किंवा घट टक्केवारी). पिकाचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न काढण्याची प्रचलित पद्धत वापरली जाणार आहे.
४	खारपाण जमिनीच्या आरोग्यामध्ये सुधारणा	खारपाण जमिनीच्या आरोग्यामध्ये सुधारणा करण्यासाठी शेतीशाळेमध्ये अवलंबलेल्या तंत्रज्ञानाचा प्रसार झालेले क्षेत्र (हे)
५	हवामान अनुकूल वाणांचा वापर	शेती शाळेमध्ये अवलंब केलेल्या हवामान अनुकूल वाणांचे प्रकल्प गावामध्ये बियाणे बदलाचे प्रमाण (टक्केवारी)

वरीलप्रमाणे सन २०२०-२१ मध्ये शेतीशाळा या घटकाची अंमलबजावणी करण्यात यावी. सदर मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या https://mahapocra.gov.inयावेबसाईटवर उपलब्ध केलेली आहे.

(विकास चंद्र रस्तोगी)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

प्रपत्र १

शेतीशाळा लक्षांक२०२०-२१

अ.क्र	जिल्हा	उपविभाग	प्रथम टप्पा शेतीशाळा (तृतीय वर्ष)			दुसराटप्पा शेतीशाळा (द्वितीय वर्ष)			तिसराटप्पा शेतीशाळा (प्रथम वर्ष)			एकूण शेतीशाळा संख्या लक्ष्यांक				महिला शेतीशाळा लक्षांक (तिसरा टप्पा)	एकूणशेतीशाळा प्रशिक्षकांची संख्या (प्रती ७ गावे एक)	एकूण समन्व-यकांची संख्या
			गावे संख्या	खरीप शेतीशाळा	रबी शेतीशाळा	गावे संख्या	खरीप शेतीशाळा	रबी शेतीशाळा	गांवे संख्या	खरीप शेतीशाळा	रबी शेतीशाळा	एकूण गावे	खरीप	रबी	एकूण शेतीशाळा			
१	औरंगाबाद	औरंगाबाद	१६	३२	१५	५८	११०	५३	६१	१२२	६१	१३५	२६४	१२९	३९३	३१	१९	२
२	औरंगाबाद	वैजापुर	३४	६६	२२	५०	७०	३५	५०	१००	५०	१३४	२३६	१०७	३४३	२५	१९	२
३	औरंगाबाद	सिल्लोड	२४	४८	२०	८१	१४७	६०	२१	४२	२१	१२६	२३७	१०१	३३८	११	१८	२
४	बीड	बीड	२०	३२	११	११५	२२८	११०	३०	६०	३०	१६५	३२०	१५१	४७१	१५	२३	२
५	बीड	माजलगाव	१८	३०	१६	६९	१२०	५२	३३	६६	३३	१२०	२१६	१०१	३१७	१७	१७	२
६	बीड	अंबेजोगाई	२०	३९	४	३२	५४	२३	५१	१०२	५१	१०३	१९५	७८	२७३	२६	१४	१
७	जालना	जालना	१३	२६	११	९४	१८७	९४	६४	१२८	६४	१७१	३४१	१६९	५१०	३२	२४	२
८	जालना	परतुर	५४	१०८	४३	८६	१६८	७६	५१	१०२	५१	१९१	३७८	१७०	५४८	२६	२७	३
९	जळगाव	जळगाव	३८	६४	१९	१०३	१३३	७६	२२	४४	२२	१६३	२४१	११७	३५८	११	२३	२
१०	जळगाव	अमळनेर	५३	५४	२३	६०	४३	२६	२९	५८	२९	१४२	१५५	७८	२३३	१५	२०	२
११	जळगाव	पाचोरा	३५	५९	२२	६१	९५	३६	५४	१०८	५४	१५०	२६२	११२	३७४	२७	२१	२
१२	लातुर	लातुर	६०	११५	४०	७५	७८	७१	२५	५०	२५	१६०	२४३	१३६	३७९	१३	२३	२
१३	लातुर	उदगीर	३४	५९	२८	६७	७४	४६	१९	३८	१९	१२०	१७१	९३	२६४	१०	१७	२
१४	उस्मानाबाद	उस्मानाबाद	३४	२४	१०	७८	१५१	४१	५५	११०	५५	१६७	२८५	१०६	३९१	२८	२३	२
१५	उस्मानाबाद	भुम	१४	२६	१४	५८	१०९	५६	४७	९४	४७	११९	२२९	११७	३४६	२४	१७	१
१६	नांदेड	नांदेड	२७	५४	२७	५६	९७	५५	१५	३०	१५	९८	१८१	९७	२७८	८	१४	२
१७	नांदेड	देगलुर	२२	४२	२०	६४	१२८	५७	२९	५८	२९	११५	२२८	१०६	३३४	१५	१६	२
१८	नांदेड	किनवट	१९	३४	१२	९०	१७१	७९	५३	१०६	५३	१६२	३११	१४४	४५५	२७	२३	२
१९	परभणी	परभणी	८३	१६५	७१	१४३	२८४	१३५	४६	९२	४६	२७२	५४१	२५२	७९३	२३	३९	४
२०	हिंगोली	हिंगोली	३९	७८	३८	१२२	२३७	११६	७०	१४०	७०	२३१	४५५	२२४	६७९	३५	३३	३
२१	अमरावती	अमरावती	६४	११८	५३	९०	१६०	६६	०	०	०	१५४	२७८	११९	३९७	०	२२	३
२२	अमरावती	मोर्शि	६५	१२१	३२	१५	२०	१०	०	०	०	८०	१४१	४२	१८३	०	११	१
२३	अमरावती	अचलपुर	४१	६६	४२	१८३	२८३	१५८	०	०	०	२२४	३४९	२००	५४९	०	३२	३

शेतीशाळा लक्षांक२०२०-२१

अ.क्र	जिल्हा	उपविभाग	प्रथम टप्पा शेतीशाळा (तृतीय वर्ष)			दुसराटप्पा शेतीशाळा (द्वितीय वर्ष)			तिसराटप्पा शेतीशाळा (प्रथम वर्ष)			एकूण शेतीशाळा संख्या लक्ष्यांक				महिला शेतीशाळा लक्षांक (तिसरा टप्पा)	एकूणशेतीशाळा प्रशिक्षकांची संख्या (प्रती ७ गावे एक)	एकूण समन्व-यकांची संख्या
			गावे संख्या	खरीप शेतीशाळा	रबी शेतीशाळा	गावे संख्या	खरीप शेतीशाळा	रबी शेतीशाळा	गावे संख्या	खरीप शेतीशाळा	रबी शेतीशाळा	एकूण गावे	खरीप	रबी	एकूण शेतीशाळा			
२४	बुलढाणा	बुलढाणा	२०	४०	१७	४८	७६	४९	२६	५२	२६	९४	१६८	९२	२६०	१३	१३	१
२५	बुलढाणा	मेहकर	१८	३४	१७	२६	३४	२४	७	१४	७	५१	८२	४८	१३०	४	७	१
२६	बुलढाणा	खामगाव	७३	१४६	६०	१८२	२९८	१३८	६	१२	६	२६१	४५६	२०४	६६०	३	३७	५
२७	अकोला	अकोला	७२	१४०	५३	१५५	२५२	१०४	१६	३२	१६	२४३	४२४	१७३	५९७	८	३४	३
२८	अकोला	आकोट	२८	५५	१५	१४९	२५९	११७	२५	५०	२५	२०२	३६४	१५७	५२१	१३	२९	२
२९	वाशिम	वाशिम	२६	५४	२३	६७	१२२	६५	३६	७२	३६	१२९	२४८	१२४	३७२	१८	१८	२
३०	यवतमाळ	यवतमाळ	४३	८६	३४	४८	९०	४४	११	२२	११	१०२	१९८	८९	२८७	६	१४	२
३१	यवतमाळ	दारव्हा	१६	३२	१४	४२	७८	३९	५	१०	५	६३	१२०	५८	१७८	३	९	१
३२	यवतमाळ	पुसद	१३	२६	१२	३७	६६	३३	१०	२०	१०	६०	११२	५५	१६७	५	८	१
३३	यवतमाळ	पांढरकवडा	२	४	२	४५	७८	३२	९	१८	९	५६	१००	४३	१४३	५	८	१
३४	वर्धा	वर्धा	१७	३४	११	२२	३६	१८	३	६	३	४२	७६	३२	१०८	२	५	१
३५	वर्धा	आर्वी	१६	३२	१	१६	२८	१०	५	१०	५	३७	७०	१६	८६	३	५	१
३६	वर्धा	हिंगणघाट	४	८	४	१२	२२	११	५	१०	५	२१	४०	२०	६०	३	३	
	एकूण		११७५	२१५१	८५६	२६९९	४५८६	२२१५	९८९	१९७८	९८९	४८६३	८७१५	४०६०	१२७७५	५०५	६८५	७०

टीप:

१. ज्या गावात खरीप हंगामात एकच प्रमुख पिकपद्धती आहे तेथे सदर पिकाची एकच शेती शाळा आयोजित करावी. त्यामुळे एकूण शेतीशाळा संख्येमध्ये बदल होऊ शकतो. प्रत्यक्षात आयोजित शेतीशाळांची संख्या प्रगती अहवालामध्ये नमूद करावी.

२. फॅसिलीटेटरची संख्या खरीपातील शेतीशाळांच्या संख्येनुसार दर्शवलेली असून रबी हंगामात सदर संख्येमध्ये बदल/वाढ होऊ शकते. फॅसिलीटेटरनिहाय शेतीशाळासंख्या निश्चित करताना गावांची भौगोलिक सलगता, गावसमूहातील अंतर, दैनंदिन भेटीसाठी करावा लागणारा प्रवास, शेतीशाळा वर्गांचे पिकनिहाय वेळापत्रक इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात. त्यामुळे एका फॅसिलीटेटरने घ्यावयाच्या शेतीशाळा संख्येमध्ये बदल होऊ शकतो. उपविभागनिहाय निश्चित केलेली फॅसिलीटेटरची संख्या प्रगती अहवालामध्ये नमूद करावी.

प्रपत्र २

तपासणी अहवाल

जिल्हाः तालुकाः गावसमुहः गावः गावाचा सेन्सस कोडः

१. तपासणी दिनांक :- / /२०

२. तपासणी अधिकारी :- श्री/श्रीमती. .....पदनाम .....

३. तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी

१. श्री..... पदनाम .....

२. श्री..... पदनाम .....

४.प्रयोगशील शेतक-याचे नाव - श्री/श्रीमती. .....

गांव ता.जि.

सर्वे नं .....

५. शेतीशाळा वर्ग क्रमांक

६. शेतीशाळा वर्गातील निरिक्षणे

१)

२)

३)

४)

तपासणी करणा-याची स्वाक्षरी

प्रपत्र ३

फळबाग शेतीशाळा प्रस्ताव

प्रती,
मा. प्रकल्प संचालक,
प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई

विषयः नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत फळबाग शेतीशाळा सुरु करणेबाबत प्रस्ताव

महोदय,

.....जिल्ह्यातील .....तालुक्यातील ..... हे गाव प्रकल्पांतर्गत .....टप्प्यात निवडण्यात आले आहे. सदर गावामध्ये सन .....च्या खरीप हंगामात ..... व ..... या पिकांच्या दोन आणि रब्बी हंगामात ..... या पिकाची एक शेतीशाळा घेण्यात येत आहेत. याशिवाय सदर गावामध्ये ..... या फळपिकाची लागवड ..... हेक्टर क्षेत्रावर असून शेतकरी सदर बागांची जोपासना करत आहेत.

करीता वरीलप्रमाणे ..... या गावामध्ये उपरोक्त शेतीशाळांव्यतिरिक्त ..... या फळ पिकाकरिता एक शेतीशाळा ..... ते ..... या कालावधीकरीता मंजूर करुन मिळणेबाबत विनंती आहे. कृषि विज्ञान केंद्र / कृषि विद्यापीठाच्या तज्ञांसोबत चर्चा करुन सदर शेतीशाळेचे वर्गनिहाय नियोजन / अभ्यासक्रम सहपत्रित केले आहे.

..... या गावामध्ये श्री / श्रीमती ....., यांचे सर्व्हे क्रमांक .....मधील ..... फळबाग लागवड ०.४० हेक्टर क्षेत्रावर प्रात्यक्षिक प्लॉट व ०.४० हेक्टर क्षेत्रावर कंट्रोल प्लॉट घेण्याकरीता योग्य आहे. तसेच शेतीशाळा घेण्याकरीता इच्छूक असल्याबाबत संबंधित शेतक-याकडून संमतीपत्र प्राप्त झाले आहे. करीता सदरची शेतीशाळा मंजूर करुन मिळणेबाबत विनंती आहे.

प्रकल्प संचालक, आत्मा
.....

सोबतः
१)फळबाग शेतकरी यादी
२)प्रगत/प्रयोगशिल शेतक-यांचा तपशील
३) शेतीशाळा वर्गनिहाय नियोजन/अभ्यासक्रम
४) प्रक्षेत्र भेटीचा अहवाल

प्रत माहितीस्तव
१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा
२) उपविभागीय कृषि अधिकारी, ..., जिल्हा

प्रपत्र ४

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत नियोजित फळबाग शेतीशाळा

प्रक्षेत्र भेटीचा अहवाल

जिल्हाः तालुकाः गावसमुहः गावः गावाचा सेन्सस कोडः

गाव खारपाण पट्ट्यातील आहे किंवा कसे?बुलडाणा, अकोला, अमरावती, जळगाव (मुक्ताईनगर) होय/नाही

१) प्रगतशील शेतक-याचे नावः ..... लिंगःस्त्री / पुरुष

पूर्ण पत्ता (पिन कोड सहित) .....

भ्रमणध्वनी क्रमांकः .....

२) प्रक्षेत्राचा तपशिल

- ७/१२ क्रमांक :..... ८ /अ नुसार एकूण क्षेत्र (हेक्टर) .....
- गावापासून प्रक्षेत्राचे अंतर : ..... कि.मी प्रक्षेत्र रस्त्यालगत आहे का? :होय / नाही
- प्रात्यक्षिक प्लाटचे क्षेत्रः .....एकर कंट्रोल प्लॉट चे क्षेत्रः ..... एकर
- ओलिताची सोयः विहिर / बोअरवेल / शेततळे / इतर (स्पष्ट करावे).....
- प्रक्षेत्र निवड करण्यास व शेतीशाळा संपूर्ण हंगामात योग्य रितीने राबविण्यास शेतक-याची लेखी संमती प्राप्त केली आहे का? :होय / नाही

३) शेतीशाळा फळबागेचा तपशिल

फळपीकः वाणः

- लागवड वर्षः ..... फळधारणा सुरु आहे का? होय / नाही
- लागवडीचे अंतर (मी.) अ) दोन ओळीतील- X मी.ब) दोन रोपातील/झाडातील- X मी.
- शेतीशाळेद्वारे प्रसार करावयाचे तंत्रज्ञान

१)

२)

३)

- शेतीशाळेसाठी निश्चित केलेला कालावधी माहे ....२०२० तेमाहे २०२१

४) निवड केलेल्या इतर शेतक-यांची (Guest Farmers) संख्याः (यादी सोबत जोडावी.)

कृषी सहाय्यक नाव व स्वाक्षरी

प्रपत्र -५

रेशीम कीटक संगोपन शेतीशाळा प्रस्ताव

प्रती,
मा. प्रकल्प संचालक,
प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई

विषयः नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत रेशीम किटक संगोपन शेतीशाळा सुरु करणेच्या प्रस्तावाबाबत...

महोदय,

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण ..... गावांमध्ये शेतीशाळा राबविण्यात येत आहे. सदर गावामध्ये सन२०१९-२० खरीप हंगामात ..... या पिकांच्या आणि रब्बी हंगामात ..... या पिकांच्या शेतीशाळा घेण्यात येत आहेत. याशिवाय ..... गावांमध्ये ..... हेक्टर क्षेत्रावर तुती लागवड प्रस्तावित असून / केलेली असून ..... इतके शेतकरी रेशीम उद्योग करण्यास इच्छुक आहेत.

करीता वरीलप्रमाणे ..... इतक्या गावामध्ये उपरोक्त शेतीशाळांव्यतिरिक्त रेशीम उद्योगाकरिता "रेशीम कीटक संगोपन" या विषयावरील प्रत्येकी एक शेतीशाळा .....ते ..... या कालावधीकरीता मंजूर करुन मिळणेबाबत विनंती आहे. कृषि विज्ञान केंद्र / रेशीम कार्यालय, औरंगाबाद यांचे तज्ञांसोबत चर्चा करुन सदर शेतीशाळेचे वर्गनिहाय नियोजन / अभ्यासक्रम सहपत्रित केलेले आहे.

जिल्ह्यामध्ये प्रस्तुत प्रकल्पांतर्गत ०.४० हेक्टर प्रती गाव या प्रमाणे रेशीम कीटक संगोपनाचे एकूण ..... प्रात्यक्षिक प्लॉट घेण्याकरीता योग्य आहेत तसेच संबधित शेतकरी शेतीशाळा घेण्याकरीता इच्छूक असल्याबाबत त्यांचेकडून लेखी संमतीपत्र प्राप्त झालेले आहे. तरी सदरचा शेतीशाळा प्रस्ताव मंजूर करुन मिळणेबाबत विनंती आहे.

सोबतः

१) रेशीम उद्योजक शेतकरी (होस्ट फार्मर) यादी
२) शेती शाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी इच्छुक असणाऱ्या शेतक-यांची(गेस्ट फार्मर) यादी.
३) शेतीशाळा वर्गनिहाय नियोजन व अभ्यासक्रम

प्रकल्प संचालक, आत्मा
जि.....

प्रत माहितीस्तव
१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,.....
२) उपविभागीय कृषि अधिकारी, ...

प्रपत्र ६

हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा करिता निविष्ठा संच

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या **"हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळेकरीता" प्रयोगशिल / प्रगत शेतक-याच्या (Host Farmer) शेतावर वापरावयाच्या निविष्ठांचा संच**खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

पीक / पीक पध्दतीचे नावः ..... क्षेत्रः ०.४० हेक्टर

अ.क्र.	निविष्ठा प्रकार	परिमाण	मात्रा (०.४० हे)	प्रति युनिट खर्च (रु.)	एकूण खर्च (रु.)
१	हवामान अनुकुल वाणाचे बियाणे व लागवड तंत्रज्ञान (बीबीएफ, मल्चिंग इ.) (कमाल रु. ३०००/- च्या मर्यादेत)				
२	१. <u>एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन</u> जैविक खते (Liquid Consortia), सुक्ष्म मुलद्रव्य, हिरवळीच्या खताचे बियाणे इ. २.<u>एकात्मिक कीड व्यवस्थापन</u> जैविक कीडनाशके, चिकट (स्टिकी ट्रॅप) सापळे, प्रकाश सापळे, परजिवी (प्रिडेटर्स व पॅरासाईडस) कीटक, निंबोळी अर्क इ. (कमाल रु. २०००/- च्या मर्यादेत)				

( ) ( )
वरिष्ठ शास्त्रज्ञ उपविभागीय कृषि अधिकारी
कृषि विज्ञान केंद्र

( ) ( )
प्रकल्प संचालक (आत्मा) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

प्रपत्र ७

शेतीशाळा होस्ट फार्मर अनुदान मागणी पत्र

दि. / /२०

प्रती,
उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग_____
जिल्हा _____

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेतीशाळा घटकामधून प्रोत्साहनपर अनुदान मिळणेबाबत...

मी श्री/श्रीमती ....., गाव....., तालुका....., जि..... या गावातील रहिवाशी आहे. माझी शेतीशाळा होस्ट फार्मर म्हणून निवड झालेली असून माझ्या सर्वे क्र. ..... मधील ०.४० हेक्टर प्रक्षेत्रामध्ये ..... या पिकाची शेतीशाळा सन २०.....-..... मध्ये घेण्यात आलेली आहे. सदर शेतीशाळा संपन्न झालेली असून होस्ट फार्मर साठी देण्यात येणारे प्रोत्साहनपर अनुदान रक्कम रु. २८००/- माझ्या बँक खात्यावर जमा करण्यात यावे.

तसेच मी सदर शेतीशाळा प्लॉटवर निविष्ठा खर्चापोटी बियाणेसाठी रु. /- आणि एकात्मिक अन्नद्रव्ये व पिक संरक्षण या बाबीवर रु. /-इतका खर्च केलेला असून त्याची नियमानुसार प्रतिपूर्ती व्हावी, ही विनंती.

सोबत: खरेदी पावती

सही/अंगठा
होस्ट फार्मर नाव:

प्रपत्र ८

(डेस्क २ समूह सहाय्यक)

स्थळ पाहणी अहवाल

अ क्र.	बाब	तपशील
१.	लाभार्थ्याचा तपशील	नाव: वर्गवारी:(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) मु.पो._____ ता. _____उपविभाग_____ जि._____
२.	तपासणी दिनांक	
३.	बाब	हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा
४.	प्लॉटचा तपशील	प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _____ प्लॉटचे क्षेत्र ------ हे. -----आर. पिकाचे नाव ---------- वाण --------
५.	शेतीशाळेचे वर्ष	(पहिले / दुसरे / तिसरे)
६.	शेतीशाळा प्लॉट गावाशेजारी आहे का?	होय/नाही
७.	शेतीशाळा प्लॉट रस्त्याच्या कडेला आहे का?	होय/नाही
८.	पाण्याचा स्त्रोत	

(नाव.....)

समूह सहाय्यक

प्रपत्र ९

मोका तपासणी अहवाल

(डेस्क ४ - कृषी सहाय्यक)

अ.क्र.	बाब	तपशील
१.	लाभार्थ्याचा तपशील	नाव: वर्गवारी:(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) मु.पो._____ ता. _____उपविभाग_____ जि._____
२.	तपासणी दिनांक	
३.	बाब	हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळा
४.	पूर्वसंमती क्र. व दिनांक	
५.	प्लॉटचा तपशील	प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _____ प्लॉटचे क्षेत्र ------ हे. -----आर. पिकाचे नाव ---------- वाण --------
६.	अनुदानाची परिगणना	प्रोत्साहनपर अनुदान रु. २८००/- निविष्ठावरील खर्च (लागू असल्यास):- १. बियाणे किंमत = रु. /- २. एकात्मिक अन्नद्रव्ये व पिक संरक्षण = रु. /-
७.	मार्गदर्शक सुचनेमधील मापदंडानुसार देय अनुदान	रक्कम रु..... /-

सदर शेतीशाळा संपन्न झालेली असून हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार देय अनुदान रक्कम रु. ...../-(अक्षरी रु. .....फक्त) श्री/श्रीमती ..... यांना अदा करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

(नाव:.....

.....)

कृषि सहायक